# श्री. धाबेकर कला महाविद्यालय

## खडकी, अकोला.

## सत्र २०१८-२०१९

## वार्षिक अहवाल

- **राष्ट्रीय योग दिवस :**

सुदृढ आरोग्यासाठी योगाभ्यास करणे काळाची गरज आहे. या हेतुने महाविद्यालयातील शारिरीक शिक्षण संचालक डॉ.सगीता लोहकपुरे ह्यांच्यां मार्गदर्शनात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले ह्या कार्यशाळेत डॉ.संगीता लोहकपुरे ह्यांनी सर्व कर्मचारी, विद्यार्थी ह्यांना शास्त्रोक्त पध्दतीने योगां करण्याचे प्रशिक्षण दिले व योगाचे महत्त्व विशद केले दि.२१.०६.२०१८ या दिवशी राष्ट्रीय योग,दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी ह्या कार्यशाळेत उपस्थित होते.

- **स्वच्छता अभियान पंधरवाडा :**

दि.०१.०८.२०१८ ते १५.०८.२०१८ या कालावधीत महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.लोहकपुरे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम अधिकारी यांच्या नेतृत्वात स्वच्छ भारत पंधरवाडा अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वच्छतेच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, आरोग्यविषयक विकासकरण्याकरीता राष्ट्रीय स्तरापासुन राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता अभियानाला महाविद्यालयीन स्तरावर प्रभाविपणे राबविण्यात यावे. व युवकांच्या माध्यमातून अभियान घराघरापर्यंत पोहचविण्याकरीता महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमाचे व उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. परिसर स्वच्छता अभियान, पॉलीथीन निर्मुलन उपक्रम अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन या प्रसंगी करण्यात आले.

उद्बोधन वर्गात मार्गदर्शन करतांना
प्राचार्या डॉ. संगिता लोहकपूरे

स्वच्छता रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थी





स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत
वृक्षारोपण करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी




वृध्दाश्रम परिसरात स्वच्छता करतांना
महाविद्यालयीन विद्यार्थी




परिसर स्वच्छतेअतंर्गत कचरा व प्लॅास्टिक निर्मुलन
करतांना प्राध्यापक वर्ग



स्वच्छ भारत अभियान अतंर्गत विचार व्यक्त करतांना
श्री. अमोल




स्वच्छता रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थी



परिसर स्वच्छता करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी

• **क्रांतीदिन :**

प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे यांच्या अध्यक्षतेखाली व इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुरेश पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.०९.०८.२०१८ रोजी क्रांतीदिन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयामध्ये करण्यात आले होते. प्रा.डॉ.सुरेश पंडित यांनी देशाच्या इतिहासामध्ये क्रांतिकाराच्या योगदानास अत्यंत महत्त्व असून त्यांच्या बलिदानावर आजचे आपले सुवर्ण दिवस आधारलेले आहेत. क्रांतिकारांचे योगदान हे सदैव युवकांना प्रेरणादायी राहील. व अशा युवकांकडून होणाऱ्या राष्ट्रनिर्मितीची ते प्रेरणास्त्रोत राहतील असे मत मांडले. या प्रसंगी प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे यांनी देखील आपले मत व्यक्त केले. याप्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे हे देखील उपस्थित होते.

१२

- **स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत 'मातोश्री वृद्धाश्रमास' भेट :**

श्री.धाबेकर कला महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे, "स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा" अंतर्गत दिनांक १४.०८.२०१८ ला स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहीमे दरम्यान महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी परिसर स्वच्छता करुन स्वच्छतेचा संदेश दिला. या वेळेस मातोश्री वृद्धाश्रम परिसराला भेट देण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी व सहा.कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.




वृध्दाश्रम परिसरात स्वच्छता करतांना
महाविद्यालयीन विद्यार्थी

- **बाल व महिला लैंगिक अत्याचारा संदर्भात कार्यशाळेचे आयोजन :**

श्री.धाबेकर कला महाविद्यालयात २८ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे बाल व महिला अत्याचार जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.लोहकपूरे यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री.विशाल मोरे, श्री.मुकूंद, सौ.शेळकेताई तसेच कार्यक्रम अधिकारी या प्रसंगी उपस्थित होते. समाजामध्ये बाल व महिला अत्याचार होने असंस्कृत असल्याचे लक्षण आहे त्या करीता प्रत्येकाने संस्कारित होणे आवश्यक आहे असे मत याप्रसंगी मान्यवरांनी मांडले. याप्रसंगी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्र. 95

करतांना प्राध्यापक वर्ग




**बाल व महिला लैंगिक अत्याचारासंदर्भात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना मान्यवर**

- **शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन :**

प्राचार्य.डॉ.संगीता लोहकपुरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक दिंनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या शिक्षकाप्रंती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूने महाविद्यालयात शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. ह्याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी सहा.कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




रा.सो.यो. अंतर्गत आयोजित शिक्षक दिनानिमित्त
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा. रेखा अढाव

- **स्थापना दिवस :**

प्रा.सुरेश पंडित यांच्या अध्यक्षतेखाली व कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२४.०९.२०१८ रोजी स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाकरीता प्रा.देशपांडे, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांनां महाविद्यालयीन स्तरावर प्राप्त झालेली अमुल्य संधी असुन त्यांनी त्याचा आपल्या शैक्षणिक विकासाकरिता व राष्ट्रनिर्मीतीकरीता उपयोग करुन घ्यावा असे मत याप्रसंगी मान्यवरांनी उपस्थित केले. देशातील युवा पिढीला योग्य दिशा देण्याची क्षमता फक्त राष्ट्रीय सेवा योजनेतच आहे असे मत याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांनी मांडले.

- **महात्मा गांधी जयंती :**

प्राचार्य डॉ.संगीता लोहकपुरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली दि.०२.१०.२०१८ रोजी म.गांधी जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.संतोष मिसाळ तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे विचारमंचावर उपस्थित होते. म.गांधींच्या तत्वांचा विचार करुन अनेक देशांमध्ये सामाजिक व राजकीय परिवर्तन झालेले पहावयास मिळते. म्हणून आजही देशाला म.गांधी यांच्या विचारांची आवश्यक्त असल्याचे दिसुन येते. याकरीता आत्मचिंतनाच्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




महात्मा गांधी जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात
विचार व्यक्त करतांना प्रा. राहूल घुगे

- **आपत्ती व्यवस्थापन जनजागृती सप्ताह :**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने दि.०९ ते १३ ऑक्टोंबर हा आपत्ती व्यवस्थापन सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला. या सप्ताह निमित्त आयोजीत कार्यक्रमात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना अपघात झाल्यास घ्यावयाची खबरदारी व करावयाचे प्रथमोपचार, अग्निशमन दलाची कार्यप्रणाली इत्यादी संबंधी प्रात्यक्षिकासहीत विद्यार्थ्यांना माहिती दिली. या प्रसंगी प्राचार्य डॉ.संगीता लोहकपुरे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व समाजात जनजागृती करण्याचे आवाहन केले.

- **राष्ट्रीय एकता दिवस :**

प्राचार्य डॉ.संगीता लोहकपुरे यांच्या मार्गदर्शनामध्ये राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.रेखा अढाव यांच्या उपस्थितीत सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती ३१ ऑक्टोंबर रोजी राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व माजी पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी

यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांना आदरांजली वाहण्यात आली. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे यांनी राष्ट्रीय एकात्मता अबाधित राहण्याच्या दृष्टीने जनजागृतीं घडली पाहिजे असे मत व्यक्त करुन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली. व राष्ट्रीय एकता दिवसाचे महत्त्व पटवून देण्यात आले. तेव्हा रासेयो चे स्वयंमसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



राष्ट्रीय एकता दिनानिमित्त एकतेची शपथ घेताना
प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी



आपत्ती व्यवस्थापन जनजागृती सप्ताह अतंर्गत
राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती देतांना मान्यवर

- **जागतिक एड्स दिवस :**

प्राचार्य डॉ.संगीता लोहकपुरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली दि.१ डिसेंबर रोजी एड्स जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आधुनिक काळात संपुर्ण जगात विक्राळ रुप धारण करणाऱ्या एड्स सारख्या समस्येला संपविण्यासाठी मानवी समाजाला एड्स मुक्त करण्याकरीता व एचआयव्ही संदर्भात सविस्तर मार्गदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांच्या मार्फत करण्यात आले.

- **संत गाडगेबाबा पुण्यतिथी :**

राष्ट्रीय सेवा योजनाचे दैवत कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी दि.२० डिसेंबर रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवून साजरी करण्यात आली. स्वच्छता अभियानामध्ये महाविद्यालय परिसरातील घान, कचरा साफ करण्यात आला आणि पर्यावरणास हानीकारक घटकांना संकलित करुन त्यांची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली या उपक्रमाचे प्राचार्यांनी देखील कौतुक केले.




संत गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त विचार व्यक्त करतांना प्राचार्य डॉ. संगिता लोहकपूरे

- **जागतिक महिला दिन :**

महाविद्यालयात दि.०८.०३.२०१९ रोजी प्रा.डॉ.संगीता लोहकपुरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाने महिलांना समानतेची वागणूक दयायला हवी कारण वर्तमान सामाजिक व्यवस्थेत स्त्रीया पुरुषाप्रमाणे अर्थाजन करण्यात अग्रणी आहेत, तर त्यांना .सामाजिक स्तरावर सुध्दा अग्रणी स्थान देणे गरजेचे आहे असे मत मान्यवंतांनी या प्रसंगी मांडले. ह्या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे हे देखील उपस्थित होते.






जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन करतांना प्रा. रेखा अढाव व उपस्थित विद्यार्थी

- **विद्यार्थीस्तरीय महिला सक्षमीकरण कार्यशाळेत सहभाग :**

मा. कुलगुरुंच्या मान्यतेनुसार दि.२५ व २६ मार्च २०१९ विद्यार्थी भवन, संगाबाअवि, अमरावती येथे द्विदीवशीय विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. वर्तमानात रासेयो विद्यार्थीनी सर्व क्षेत्रात सक्षम असाव्या या उद्देशाने आरोग्य जागृती स्वयंसरक्षण, जीवनशैली, विकास, शारिरीक दृष्ट्या सक्षम इ.बाबी लक्षात घेवून सदर महिला सक्षमीकरन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत महाविद्यालयीन विद्यार्थी कु.काजल वानखडे व कु.आंचल ठाकूर ह्या सहभागी झाल्या होत्या.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

श्री संत ज्ञानेश्वर बहुउद्देशिय मंडळ, धाबा द्वारा संचालित

# श्री धाबेकर कला महाविद्यालय

## खडकी, ता. जि.अकोला

# राष्ट्रीय सेवा योजना

## स्वच्छ भारत अभियान

## सत्र २०१८ - १९

**एक कदम स्वच्छता की ओर**

स्वच्छ भारत

अभियान

राष्ट्रीय सेवा योजना

NATIONAL SERVICE SCHEME

# स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा अहवाल

स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा अंतर्गत श्री. धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने महाविद्यालयाचे सन्माननिय प्राचार्य डॉ. एस.एल. पंडीत यांच्या मार्गदर्शनात तसेच रासेयोकार्यक्रमअधिकारी प्रा. रेखा अढाव यांच्या नेतृत्वात सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. निता तिवारी यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**१) स्वच्छतेची शपथ (दि. ०६.०८.२०१८) :**

श्री. धाबेकर कला महाविद्यालयात दि. ०६.०८.२०१८ रोजी स्वच्छ भारत अभियानअंतर्गत स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. एल. एल. पंडीत यांच्यासह रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. रेखा अढाव सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. निता तिवारी उपस्थित होते. गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यार्थ्यांसह सर्वांनी स्वच्छतेची शपथ घेवून आपला भारत, आपला गाव, मोहल्ला, परिसर स्वच्छ ठेवण्याची शपथ घेतली. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा.डॉ. संतोष मिसाळ, प्रा. अमरिष गावंडे, प्रा. राहुल घुगे आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

**२) स्वच्छ भारत विषयावर चर्चासत्र (दि. ०७.०८.२०१८) :**

श्री. धाबेकर कला महाविद्यालयात दि. ०७.०८.२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्याद्वारे आयोजित स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी तसेच सहायक का. अधिकारी डॉ. निता तिवारी यांच्या उपस्थितीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रम प्रसंगी कर्मयोगी गाडगेबाबांच्या प्रमिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आली. रासेयो कार्यक्रमअधिकारी प्रा. रेखा अढाव यांनी चर्चासत्राचे प्रारंभी विद्यार्थ्यांना स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आयोजित चर्चासत्राची पार्श्वभूमी आणि महत्व विशद केले. स्वच्छ भारत अभियान ही आजच्या आधुनिक युगात एक सामाजिक चळवळ झाली पाहिजे त अशा चळवळीत विद्यार्थ्यांनी जातीने सहभागी झाले पाहिजे असे सांगितले. सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. निता तिवारी यांनी देखील याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि चर्चासत्राची धुरा विद्यार्थ्यांकडे सोपविली.

चर्चासत्रामध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी आपली मते खुलेपणाने व्यक्त केली. स्वच्छ भारत अभियान उज्वल भारताच्या विकासाकरिता आवश्यक असलेली लोकचळवळ आहे आणि आम्ही विद्यार्थी या चळवळीप्रती समर्पित आहोत असा सारांश सदर चर्चासत्रातून निघाला.

**३) स्वच्छ भारत अभियान व्याख्यान :**

श्री. धाबेकर कला महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत स्वच्छ भारत स्वस्थ भारत या विषयावर व्याख्यानाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाच्या वतीने घेण्यात आले. कार्यक्रमप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमअधिकारी प्रा. रेखा अढाव तसेच सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. निता तिवारी आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री अमोल सावंत (संस्थपक - निसर्गकट्टा समाजसेवक) उपस्थित होते.

याप्रसंगी कर्मयोगी गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्प अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय प्रा. रेखा अढाव यांनी करून दिला. मार्गदर्शकांचे स्वागत प्रा. रेखा अढाव यांनी केले. प्रास्ताविकपर भूमिका विशद करतांना प्रा. रेखा अढाव यांनी स्वच्छ भारत अभियान हा उपलक्रम नसून ती जीवनशैली आहे असे सांगितले. स्वच्छ भारत अभियान आज आम्हाला काय्रक्रमस्वरुपात राबविण्याची गरज पडत आहे ही अभियान भारताला उज्वल भष्यिाकडे नेणारी कृती असल्याचे मत व्यक्त केले.

प्रमुख मार्गदर्शक श्री. अमोल सावंत यांनी आपल्या विचारांमधे स्वच्छ भारत अभियान हे भारत देशातील सर्वात मोठे नि परिवर्तनवादी अभियान असल्याचे सांगितले. प्रकृतीमधे व्यवस्था आहे आणि त्या व्यवस्थेचा सम्मान करून प्रत्येकाने प्रकृतीच्या नियमांचे पालन करावे आणि निसर्गामधे संतुलन राखण्याकरिता प्रयत्नरत असावे. मानवेतर प्रकृतीच्या संरक्षणाशिवाय मानव सुखरूप राहणे अशक्य आहे. मानवाला या पृथ्वीवर सुखपूर्वक जगायचे असेल तर जीने दो और जिओ तत्वाचे पालन करणे अनिवार्य आहे. इतरांना सुखाने जगू दिल्याशिवाय मी सुखाणे जगू शकत नाही. मानव आणि प्रकृती हे परस्परपूरक आहेत असे सार्थक विचार मांडून त्यांनी आपल्या मार्गदर्शनाची सांगता केली. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ.निता तिवारी यांनी स्वच्छ भारत अभियानाच्या आवश्यकतेची अपरिहार्यता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे संचालन कु. मिनल राखोंडे हीने केले तर आभारप्रदर्शन कु. भाग्यश्री तांबडे हीने केले यावेळी विद्यार्थी -विद्यार्थीनी आणि प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.

**४) महाविद्यालय परिसर स्वच्छता :**

श्री. धाबेकर कला महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत महाविद्यालय परिसर स्वच्छता करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या मार्गदर्शना तसेच रासेयो कार्यक्रमअधिकारी प्रा. रेखा अढाव यांच्या नेतृत्वात सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. निता तिवारी यांच्या सहायतेने महाविद्यालयाचा अंतर्गत आणि बाहय परिसर स्वच्छ

करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी परिसरातील प्लॉस्टिक, कागद आणि इतर कचरा गोळा करून त्याची यथायोग्य विल्हेवाट लावण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा वसा कायम करण्याचा संकल्प केला. यावेळी महाविद्यालयाती प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मोठया संख्येनी उपस्थित होते.

**५) मातोश्री वृदधाश्रम परिसरात स्वच्छता :**

श्री. धाबेकर कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने स्थानिक शिवापूर परिसरातील मातोश्री वृदधामश्रम परिसरातील स्वच्छता करण्यात आली. रासेयोच्या पथकाने स्वच्छ भारत अभियानअंतर्गत मातोश्री वृदधाश्रम परिसरात स्वच्छता करून विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या वतीने अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. वृदधाश्रमातील सदस्यांशी हितगूज करून त्यांच्याप्रती आपली संवेदना व्यक्त केली. याप्रसंगी प्रा. रेखा अढाव यांनी आपले विचार व्यक्त केले. व्यवस्थापक श्री. गावंडेभाऊ यांनी रासेयो पथकाचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी महाविद्यालयातील प्रा. अमरिष गावंडे, प्रा.डॉ.संतोष मिसाळ यांच्यासह विद्यार्थी - विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

**६) स्वच्छता रॅली :**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत श्री. धबेकर कला महाविद्यालयातील रासेयोच्या पथकाच्या वतीने स्वच्छता आयोजन करण्यात आले. स्वच्छ भारत अभियान पंधरवाडाअंतर्गत स्वच्छतेचा संदेश देऊन स्वच्छतेचे महत्तव या रॅलीतून विशद करण्यात आले.


**७) स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत वृक्षारोपण :**

श्री. धाबेकर कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने स्वच्छ भारत अभियाअंतर्गत वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालय परिसरात यादरम्यान वृक्षारोपण करण्यात आलॄ याप्रसंगी प्राचार्य डॉ.एस.एल.पंडित, प्रा.डॉ.संतोष मिसाळ, रासेयो कार्यक्रमअधिकारी प्रा. रेखा अढाव सहायक कार्यक्रम अधिकारी, प्रा.डॉ. निता तिवारी उपस्थित होत्या. वृक्षारोपणासोबतच स्वच्छतेचा संकल्प याप्रसंगी करण्यात आला.

**८) स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत कापडी पिशव्यांचे वाटप :**

श्री. धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्लास्टिकला पर्याय म्हणून कापडी पिशव्या पर्यावरणपूरक आहेत. मानवाला पर्यावरणस्नेही जीवनशैली आत्मसात करून निसर्गाच्या सुंदृढतेसाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत प्रा. रेखा अढाव यांनी व्यक्त केले.

अशा प्रकारे १५ ऑगस्टला स्वच्छ भारत अभियानाची सांगता करण्यात आली.



स्वच्छतेची शपथ



स्वच्छ भारत विषयावर चर्चासत्र



स्वच्छ भारत अभियान व्याख्यान




महाविद्यालय परिसर स्वच्छता



वृध्दाश्रम अल्पोपहार वाटप




वृध्दाश्रम परिसरात स्वच्छता




स्वच्छता रॅली



कापडी पिशव्यांचे वाटप




स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत वृक्षारोपण

# श्री.धाबेकर कला महाविद्यालय,
# खडकी अकोला.
## सत्र २०१९-२०२०
## - वार्षिक अहवाल -

सत्र २०१९-२०२० मध्ये मा.प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे यांच्या मार्गदर्शनात तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.रेखा अढाव यांच्या सहकार्याने समाजहितपयोगी व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाकरिता विविध कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयामार्फत करण्यात आले. या राबविलेल्या उपक्रमाचा सविस्तर अहवाल आपणाकडे सविनय सादर करित आहो.

- **आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा :**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.२१.०६.२०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. योग दिनानिमित्य महाविद्यालयात आयोजीत कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांनी योगाचे महत्त्व सांगीतले. या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांनी योग हा भारतीय जीवनशैलीचा एक महत्त्वाचा घटक असुन योगाचा अंतर्भाव आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्येकाने करावा असा विचार मांडला.

राज्य शासनाच्या नामनिर्देशानुसार आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्य डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे सकाळी ०६:३० वाजता मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अकोला जिल्ह्याचे मा.जिल्हाधिकारी श्री.पापळकर साहेब हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी देखील हजेरी लावली होती. कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व रासेयो चे स्वयंसवेक यांनी ह्या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदविला.



योगा करतांना


महाविद्यालयीन कर्मचारी



योगा करतांना
महाविद्यालयीन कर्मचारी




राज्य शासन आयोजित योगा
दिनानिमित्त कार्यक्रमात
सहभागी विद्यार्थी



आंतरराष्ट्रीय योग
दिनानिमित्त कार्यक्रमात
कार्यक्रमात सहभागी
कार्य.अधिकारी प्रा.राहुल घुगे

55 वि

- **तंबाखु व्यसनमुक्तीसाठी सामुहीक शपथ :**

देशामध्ये दरवर्षी लाखो लोक तंबाखु सेवनाने मृत्युमुखी पडतात. अशावेळेस तरुणांना, युवकांना तंबाखुमुक्त करणे, त्यांना वाईट सवयीपासून दुर करणे हा हेतु ठेवून महाविद्यालयात दि.११ जुलै २०१९ रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली तसेच रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांच्या उपस्थितीत सामुदायिक शपथ घेण्यात आली. महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग व रा.से.यो. चे स्वयंसेवक मोठ्या संख्येने या प्रसंगी उपस्थित होते.

तंबाखु विरोधी शपथ घेतांना
विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग



* **क्रांतिदिन :**

प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुरेश पंडित ह्यांच्या प्रमुख उपस्थितीत **दि.०९.०८.२०१९** रोजी क्रांतिदिन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या प्रसंगी प्रा.संदीप डोंगरे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित 65

..2..

होते. क्रांतिकारकांचे योगदान हे सदैव युवकांना प्रेरणादायी राहून, युवकाकडून होणाऱ्या राष्ट्रनिर्मीतीचे ते प्रेरणास्त्रोत आहे असे मत मान्यवरांनी या प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांनी देखील ह्याप्रसंगी आपले मत मांडलेत क्रांतिदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयीन परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपन देखील करण्यात आले.




क्रांतीदिन प्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या वेळी पुजर करतांना प्राचार्य डॉ.लोहकपूरे आणि प्रा.संदिप डोंगरे

**• विद्यापीठस्तरीय वादविवाद स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग :**

राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व भारत सरकारद्वारा आयोजित आंतरमहाविद्यालयीन विद्यापीठस्तरिय वादविवाद स्पर्धा **दि.२० ऑगस्ट २०१९** रोजी डॉ.आर.जी.राठोड कला व विज्ञान महाविद्यालय मूर्तीजापूर येथे आयोजीत करण्यात आली होती. यात महाविद्यालयातील दोन विद्यार्थी अनुक्रमे कार्तिक गजानन घोगरे व वृषभ संजय पद्‌मणे हे सहभागी झाले होते.

02

- **एड्स जनजागृती :**

महाविद्यालयात दि.२७.०८.२०१९ ला प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे यांच्या अध्यक्षतेखाली एड्स जनजागृतीवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रा.अमरिष गावंडे तसेच प्रा.राहुल घुगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांनी देखील विद्यार्थ्यांना या असाध्य रोगाविषयी माहिती दिली व समाजात याबाबतीत जनजागृती करण्याचे आवाहन केले.

40

- **स्थापना दिन :**


महाविद्यालयात प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व प्रमुख मार्गदर्शक प्रा.मोहन बल्लाड ह्यांच्या उपस्थितीत रा.से.यो. स्थापना दिवस दि.२४.०९.२०१९ रोजी साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करुन देते. त्याचा फायदा त्यांनी आपल्या कलागुणांना विकसीत करण्यासाठी करावा असे मत आपल्या प्रास्ताविकपर भाषणात प्रा.राहुल घुगे यांनी व्यक्त केले. तर विद्यार्थ्यांनी समाजहितासाठी परोपकार भावनेने कार्य करुन समाजाचे ऋण फेडावे असे मत प्रा.मोहन बल्लाड यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चारुशिला लोणकर तर आभार प्रदर्शन दिपाली सोळंके हिने केले.



रा.सै.यौ. स्थापना दिवस
निमित्त विचार व्यक्त
करताना प्रा.मौहन बल्लाड
व उपस्थित विद्यार्थी



स्थापना दिवस निमित्त विचार व्यक्त करताना
प्रा. मौहन बल्लाड

- **वृक्षारोपण :**

महाविद्यालयाच्या रासेयो पथकाच्या वतीने 'स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत' वृक्षारोपनाचा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र

शासनाच्या वृक्ष लागवड उपक्रमांतर्गत संकल्पनेला मुर्तरूप देवून वृक्षारोपन व वृक्षसंवर्धन हा कार्यक्रम घेण्यात आला. दि.०१ जुलै ते ०७ जुलै दरम्यान ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना वृक्षारोपनाने वृक्षांची संख्या वाढून पर्यावरण समतोल राखण्यास मदत होईल असे मत व्यक्त केले. ह्या प्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक व रा.से.यो. स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


कला महाविद्यालय

- **मातृभाषा दिवस साजरा :**

श्री.धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मातृभाषा दिनाचे आयोजन करण्यात आले होत. **दि.२१.०२.२०२०** रोजी आयोजित कार्यक्रमास महाविषलयाच्या प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्या अध्यक्षस्थानी होत्या, तर कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व प्रा.डॉ.सुरेश पंडीत हे देखील विचार मंचावर उपस्थित होते. प्रा.राहुल घुगे ह्यानी मातृभाषेचे महत्त्व विषद केले तर मातृभाषा ही ज्ञानभाषा व्हावी असे विचार डॉ.लोहकपूरे ह्यांनी व्यक्त केले.




रा.से.यो.द्वारा आयोजित मातृभाषा दिवस कार्यक्रमात
विचार व्यक्त करतांना प्रा.राहुल घुगे

- **विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण कार्यशाळेस मूलींचा सहभाग :**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे आयोजीत महिला सक्षमीकरण कार्यशाळेत महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक कु.पायल संतोष चव्हाण व कु.काजल अर्जुन वानखडे यांनी सहभाग नोंदविला. ही कार्यशाळा **दि.०८ व ०९ मार्च २०२०** रोजी संगाबाअवि, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती.

02

87





संत गाडगेबाबा जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात
प्राचार्य डॉ.लोहकपुरे आणि प्रा.इचे मॅडम
ह्यांच्यासोबत विचार व्यक्त करतांना प्रा.राहुल घुगे

- **विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण कार्यशाळेस मूलींचा सहभाग :**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे आयोजीत महिला सक्षमीकरण कार्यशाळेत महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक कु.पायल संतोष चव्हाण व कु.काजल अर्जुन वानखडे यांनी सहभाग नोंदविला. ही कार्यशाळा **दि.०८ व ०९ मार्च २०२०** रोजी संगाबाअवि, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती.

02

87



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

राष्ट्रीय सेवा योजना द्वारा आयोजित

## विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण द्विदिवसीय कार्यशाळा

### प्रमाणपत्र

श्री./कु. काजल अर्जुन वानखडे

महाविद्यालयाचे नांव : श्री धाबेकर कला महाविद्यालय, अकोला.

आपण दि. ०८ व ०९ मार्च, २०२० या कालावधित के. जी. देशमुख सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण द्विदिवसीय कार्यशाळेत सहभागी झाल्याबद्दल आपणास प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

भविष्यात रा.से.यो.च्या माध्यमातून सामाजिक जाणिवेतून राष्ट्रीय कार्यात सहभाग मिळेल या अपेक्षेसह शुभेच्छा!

(डॉ. राजेश बुरंगे)
प्र. संचालक
राष्ट्रीय सेवा योजना,

(डॉ. मुरलीधर चांदेकर)
कुलगुरु
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

राष्ट्रीय सेवा योजना द्वारा आयोजित

## विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण द्विदिवसीय कार्यशाळा

## प्रमाणपत्र

श्री./कु. पायल संतोष चव्हाण

महाविद्यालयाचे नांव : श्री. धाबेकर कला महाविद्यालय, अकोला.

आपण दि. ०८ व ०९ मार्च, २०२० या कालावधित के. जी. देशमुख सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित विद्यापीठस्तरीय महिला सक्षमीकरण द्विदिवसीय कार्यशाळेत सहभागी झाल्याबद्दल आपणास प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

भविष्यात रा.से.यो.च्या माध्यमातून सामाजिक जाणिवेतून राष्ट्रीय कार्यात सहभाग मिळेल या अपेक्षेसह शुभेच्छा!

(डॉ. राजेश बुरंगे)
प्र.संचालक
राष्ट्रीय सेवा योजना,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(डॉ. मुरलीधर चांदेकर)
कुलगुरु
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती


**• कोरोना आजाराबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

देशामध्ये पसरलेल्या कोरोना व्हायरस या विषाणूबाबत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत जागरुकता करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मास्क बनवून वाटप करणे सोशल मिडीयावर जनजागृती करणे या संबंधी आवाहन करण्यात आले तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या नियमांना जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य देखील या प्रसंगी

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या माध्यमातून करण्यात आले. कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्याच्या हेतूने कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांनी जिल्ह्यातील चेकपोस्ट वर आपल्या कर्तव्याचे निर्वाहन करुन शासकिय कामात मदत केली.




कोरोना संदर्भात
जनजागृती करतांना
महाविद्यालयीन विद्यार्थी



सोशल मिडियावर मास्क वापरण्या
संदर्भात जनजागृती करतांना
प्रा.राहुल घुगे व विद्यार्थी



कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी शासकीय
कामात मदत करतांना प्रा.राहुल घुगे




शासकिय कामात कोविड योद्धाचे
कार्य करतांना प्रा.राहुल घुगे

महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

पृष्ठे : १०+४ = १४, किंमत: ₹ ५.००

अकोला, सोमवार, दि. २४ जून २०१९


## जागतिक योग दिन विविध ठिकाणी साजरा

ेट: स्थानिक पोपटखेड रोडवरील
णी इंग्लिश स्कूलमध्ये २१ जून रोजी
तरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा
ण्यात आला. विद्यार्थ्यांनी यावेळी
तरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित
ेष योग क्रिया तथा योगासनांची
यक्षिके केलीत. यावेळी योग दिनाचे
त्व तथा योगाची गरज याविषयी
ार्य विजय भागवतकर यांनी
ार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी
ेच्या शिक्षिका रंजना मोरे यांनी
ार्थ्यांना विविध योगासने व
क्रिया शिकवल्या. योग
निमित्तच्या या योग प्रात्यक्षिक
रीकरणात शाळा अध्यक्ष स्मिता
नी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य
य भागवतकर मुख्याध्यापक प्रशांत
े स्नेहल अभ्यंकर यांच्या उपस्थितीत
ेतील सर्व शिक्षक शिक्षिका
ार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला

**अकोला:** शहरातील श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, आरोग्य समिती, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागातर्फे आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका, उपाध्यक्ष रविकुमार गोयनका, सचिव आलोककुमार गोयनका, प्राचार्य डॉ. देवेंद्र व्यास यांच्या मार्गदर्शनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. श्यामकुमार हांडे, जर्नादन अवचार, नवथडे, प्रा. श्वेता मेंढे, प्रभारी प्राचार्य डॉ. अंजली राजवाडे, डॉ. अंबादास पांडे आदी उपस्थित होते. कार्यक्रामचे आयोजन प्रा. श्वेता मेंढे, प्रा. सोनल कामे, डॉ. उमेष पाटील, डॉ. विनोद चव्हाण यांनी केले. यावेळी योगेश बानाईत, वसंता पिंजरकर, राजू दीक्षित, सुनील मावळे, त्रिलोकसिंग रोहेल, अशोक दीक्षित, विष्णू डोणे यांनी सहकार्य केले.

**मूर्तिजापूर :** स्थानिक श्री गाडगे महाराज महाविद्यालयात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. संतोष ठाकरे, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सुरुवातीला शारीरिक शिक्षण संचालक डॉ. राकेश बडगुजर यांनी योगासंबंधी माहिती दिली. त्यानंतर योगासनाचे प्रात्यक्षिक सादर करुन उपस्थितांनी सर्व योगासने केलीत. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप शहाडे व डॉ. रिता देशमुख यांनी केले होते.

**अकोला :** स्थानिक श्री धाबेकर कला महाविद्यालयात पाचव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रभारी प्राचार्य व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. संगीता लोहकपुरे यांनी विविध योगासने प्रात्यक्षिक दाखवून सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. योग प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात प्रा. रेखा अढाव, डॉ. तिवारी, डॉ. पंडित, डॉ. मिसाळ, प्रा. घुगे, विनोद महाजन, मनोज नंदापुरे, संतोष जामोदे, शेषराव जाधव, महादेव गालट, सुधाकर चव्हाण, अनिल खरात, शशिकांत जामनिक यांनी भाग घेऊन योगासने व प्राणायाम केले.

**पातूर:** येथील डॉ. वंदनाताई जगन्नाथ ढोणे ग्रामीण आयुर्वेदिक महाविद्यालयात योग दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी धन्वंतरीचे पूजन प्राचार्य डॉ. मावळे, उपप्राचार्य डॉ. अभय भुस्कडे व डी. एम. पणसकर यांनी केले. स्वास्थवृत्त व योगा विभागाच्या प्रमुख डॉ. सुनीता कदम व व्याख्याता डॉ. प्रवीण वक्ते यांनी योगवर्ग घेऊन सुखायू आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. संचालन धनंजय मिश्रा यांनी केले. यावेळी डॉ. जयश्री काटोले, डॉ. शेळके, डॉ. महाजन, डॉ. इंगळे, डॉ. पाचपोर, डॉ. ताले, डॉ. केचे, डॉ. शेंडे, दीपक झा, किशोर निमकाळे, वासुदेव निमकंडे, राठोड, संदीप गिऱ्हे, प्रभाकर कव, मनोहर उगले, सुनील पाटील, सुर्या चव्हाण, संदीप चव्हाण, माणिक खिल्लारे, दिलीप बगाडे, मन्वरखान, काशीराम गाडगे, अ. फय्याज, डॉ. खंडारे, डॉ. किशोर अरबट, डॉ. दिलीप अतकर तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते.

**बार्शीटाकळी :** येथील तहसील कार्यालयाच्या प्रांगणात शेकडो योगकर्त्यांनी योग साधना करुन योग दिन साजरा केला. याप्रसंगी योग शिक्षीका रुपाली गजानन कोनसे यांच्या मार्गदर्शनात योगासने घेण्यात आली. योग साधनेचे आयोजन गोविंद राऊत, सुरेश हिवराळे, अनिकेत भातखडे, अनंता राऊत, रवी अहीर, गजानन कोनसे यांनी केले होते.


जनमाध्यम

शनिवार २८ सप्टेंबर २०१९

# धाबेकर कला महाविद्यालयात रासेयो स्थापना दिवस

प्रतिनिधी/ २७ सप्टेंबर


अकोला :- स्थानिक श्री धाबेकर कला महाविद्यालय खडकी, अकोला येथे प्राचार्य डॉ.संगिता लोहकपुरे यांच्या अध्यक्षतेखाली व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाकरिता प्रा.मोहन बल्लाड प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा.राहुल घुगे ह्यांनी रा.से.यो.च्या स्थापने संदर्भात माहिती विद्यार्थ्यांना दिली. व रा.से.यो.च्या कृतीने जे व्यासपीठ उपलब्ध होते त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी आपले कलागुणांना वाव देण्यासाठी करावे असे सांगितले. प्रमुख मार्गदर्शक प्रा.मोहन बल्लाड ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांनी रासेयोच्या माध्यमातून समाजउन्नतीसाठी आपले योगदान देवून समाजकार्यासाठी झटावे असे मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या डॉ.संगिता लोहकपुरे ह्यांनी विद्यार्थ्यांनी समाजहितासाठी परोपकार भावनेने कार्य करून समाजाचे ऋण फेडावे असे मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु.चारुशिला लोणकर तर आभार प्रदर्शन कु.दिपाली सोळंके ह्यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात रासेयो. स्वयंसेवक उपस्थित होते.



जनमाध्यम

रविवार, ०६ ऑक्टोबर २०१९

# श्री धाबेकर कला महाविद्यालयात स्वछता अभियान मोहीम



अकोला :- स्थानिक श्री धाबेकर कला महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती दिनी रा.से.यो. व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक कार्यक्रमासह स्वच्छता अभियान मोहीम राबविण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ संगीता लोहकपुरे, प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. सुरेश पंडित व रासेयो कार्यक्रम प्रमुख प्रा. राहुल घुगे हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरवात दिपप्रज्वलनाने करण्यात आली रासेयोच्या माध्यमातून राष्ट्रसेवा करण्याची संधी मिळते त्यांचे सोने करा हीच खरी महापुरुषांना आदरांजली ठरेल असे मत प्रास्ताविकातून प्रा. राहुल घुगे यांनी मांडले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी मनोगतातून विश्वशांती व मानवकल्याणासाठी महात्मा गांधींचे विचार अंगीकृत करून कृतिशील होणे हि काळाची गरज असल्याचे पटवून दिले. अध्यक्षीय विचारातून प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांनी जयंती साजरी करण्याबरोबरच गांधीवादी बनून जागतिक समस्येच्या निराकरणासाठी योगदान द्या हा मोलाचा संदेश दिला. याप्रसंगी महाविद्यालय परिसराची स्वच्छता मोहीम ही राबविण्यात आली. यशस्वीतकरीता महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. संचालन कु. दिपा शिरसाट व आभार प्रदर्शन प्रतीक कांबळे यांनी केले.

जनमाध्यम

गुरूवार, २७ फेब्रुवारी २०२०


# धाबेकर कला महाविद्यालयात मातृभाषा दिवस साजरा

प्रतिनिधी/ २६ फेब्रुवारी

अकोला :- धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मातृभाषा दिवस हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संगिता लोहकपुरे ह्या होत्या. तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व प्रा.डॉ.सुरेश पंडित हे देखील प्रामुख्याने विचार मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमापूजनाने तसेच दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा.राहुल घुगे ह्यांनी मातृभाषेचे महत्व विषद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ.लोहकपुरे ह्यांनी मातृभाषा हि ज्ञानभाषा व्हावी यादृष्टीने मातृभाषेचे संवर्धन करावे असे आवाहन याप्रसंगी केले. या समयी प्रा.डॉ.सुरेश पंडीत यांनी दैनदिन कामकाजामध्ये मातृभाषेला प्राधान्य देवून या भाषेचा प्रसार व प्रचाराकरिता कार्य करावे असे मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन कल्याणी लुले तर आभार दीपा सिरसाट यांनी केले.

अकोला, गुरूवार, २७ फेब्रुवारी २०२०

# धाबेकर कला महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबवून संत गाडगेबाबांना अभिवादन




प्रतिनिधी/ २६ फेब्रुवारी

अकोला :- स्थानिक श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने संत गाडगेबाबा यांच्या जयंतीदिनी स्वच्छता अभियान राबवून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.संगिता लोहकपुरे ह्या होत्या. तर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व प्रमुख अतिथी म्हणून प्रा.किरण इचे हया विचारमंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमापूजनाने तसेच दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा.राहुल घुगे ह्यांनी संत गाडगेबाबा यांचे विचार घराघरात पोहचविण्याचे आवाहन केले. पाचार्य डॉ.लोहकपुरे ह्यांनी हया प्रसंगी विद्यार्थ्यांना संत गाडगेबाबा यांच्या विचारावर चालून राष्ट्रउन्नतीत आपला हातभार लावावा असे आवाहन केले तर प्रा.किरण ईचे ह्यांनी संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेचे महत्व सांगुन परिसर स्वच्छतेवर भर द्यावा असे मत मांडले. यासमयी महाविद्यालयात स्वच्छता अभियान देखील राबविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रतिक कांबळे ह्यांनी तर आभार प्रदर्शन स्वेजल लखाडे ह्यांनी केले.

# श्री.धाबेकर कला महाविद्यालय,
# खडकी अकोला.
## सत्र २०२०-२०२१
## - वार्षिक अहवाल -

सत्र २०१९-२०२० मध्ये मा.प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे यांच्या मार्गदर्शनात तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल धुगे व सहा.कार्यक्रम अधिकारी प्रा.रेखा अढाव यांच्या सहकार्याने राष्ट्रपुर्णनिर्माण व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाकरिता विविध कार्यक्रमाचे आणि उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयामार्फत करण्यात आले. युवकामध्ये देशप्रेम आणि सामाजिक जाणीव निर्माण व्हावी व राष्ट्राच्या विकासाकरिता आवश्यक सशक्त युवकांची निर्मीती करण्याच्या हेतूने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा आणि उपक्रमांचा वार्षीक अहवाल आपणाकडे सविनय सादर करित आहो.

- **राष्ट्रीय योग दिन साजरा :**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योगदिनानिमीत्य सार्वजनिक स्तरावर कार्यक्रम शक्य नसल्यामुळे शासनाच्या नियमानुसार Yogo@Home and Yoga with family नुसार योगा दिन साजरा करावयाचा असल्यामुळे दि.२१ जुन २०२० रोजी सर्व स्वंयसेवकांना ऑनलाईन पद्धतीने घरीच योगा करण्याचे सांगण्यात आले. महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी देखील या उपक्रमात आपले योगदान दिले. या प्रसंगी शा.विभाग प्रमुख डॉ.संगीता लोहकपूरे यांनी विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारच्या आसनांचा सराव करुन घेतला. 52





कोविड प्राधुर्भावामुळे
शासन नियमानुसार
अंतरराष्ट्रीय
योग दिनानिमित्त
घरीच योगा करतांना
कार्यक्रम अधिकारी
प्रा.राहुल घुगे

• **क्रांती दिन :**

देशाच्या इतिहासात क्रांतीकारकांच्या योगदानास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. क्रांतीकारकांची योगदान हे सदैव युवकांना प्रेरणादायी राहलेले आहे. तोच धागा पकडून महाविद्यालयात डॉ.नीता तिवारी ह्यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९ ऑगस्ट, २०२० रोजी क्रांतीदिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुरेश पंडित मुख्य मार्गदर्शक म्हणून लाभले होते. आभासी पद्धतीने त्यांनी विद्यार्थ्यांशी हितगूज साधून त्यांना मार्गदर्शनही केले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांनी देखील याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

85







क्रांतीदिनानिमित्त
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे

- **गंदगीमुक्त अभियान :**

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत 'गंदगीमूक्त अभियान' हे ८ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२० या कालावधीत महाविद्यालय परिसरात राबविण्यात आले. या कालावधीत महाविद्यालय परिसरात वाढलेले रावत काढुन सभोवतालच्या परिसरातील केरकचरा व प्लास्टीक इ. साफ करण्यात आले. दि.१३ ऑगस्ट रोजी महाविद्यालयीन परिसरातील साफसफाई करतांना महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी साफसफाई करुन परिसर स्वच्छ केला.

92

गंदगीमुक्त अभियानांतर्गत
महाविद्यालयीन परिसरात
स्वच्छता मोहीम राबवितांना
महाविद्यालयीन कर्मचारी



- **शिक्षक दिन :**

महाविद्यालयात दि.०५ सप्टेंबर, २०२० रोजी 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. या प्रसंगी कोरोना ताळेबंदी मुळे आभासी पद्धतीने विद्यार्थ्यांशी हितगुज साधण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्या होत्या. राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.संतोष मिसाळ व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे हे देखील या प्रसंगी उपस्थित होते. व त्यांनी देखील या प्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांनी, ''विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर्श घेवून आपला शैक्षणिक आलेख उंचवावा'' असे मत याप्रसंगी मांडले.




शिक्षक दिनानिमित्त
मार्गदर्शन करतांना
प्राचार्य डॉ.संगीता लौहकपूरे

- **स्थापना दिवस :**

कोरोना महामारिच्या काळात देखील राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जाऊ शकतात असे मत कार्यक्रम अधिकारी प्रा.राहूल घुगे ह्यांनी विद्यार्थ्यांशी आभासी पद्धतीने संवाद साधतांना व्यक्त केले. २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजनाचा स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर प्राप्त झालेली सुवर्ण संधी असुन विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग स्वतःचा शैक्षणिक आलेख उंचविण्याकरीता तसेच राष्ट्रनिर्मीती करीता करावा असे मत व्यक्त केले. याप्रसंगी प्रा.डॉ.सुरेश पंडित हे देखील उपस्थित होते व या कोरोना महामारिच्या काळात रासेयो स्वंयसेवकांनी आपआपल्या परीने याबाबतीत जनजागृती करावी असे आवाहन केले.

96

रा.से.यो. स्थापना दिनानिमित्त
आभासी पद्धतीने
विचार व्यक्त करतांना
प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे



- **महात्मा गांधी जयंती :**

महात्मा गांधी जयंती **दि.०२ ऑक्टोंबर** रोजी साजरी महाविद्यालयात करण्यात आली. ह्या प्रसंगी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.संतोष मिसाळ अध्यक्षस्थानी होते. तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुरेश पंडित उपस्थित होते. या प्रसंगी विचार व्यक्त करतांना प्रा.डॉ.संतोष मिसाळ ह्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या सर्वांगीन विकासाकरीता महात्मा गांधीजींच्या विचारांचा अंगीकार आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.


९५




महात्मा गांधी जयंतीनिमित्त
विचारव्यक्त करतांना
कार्यक्रम अधिकारी
प्रा.राहुल घुगे

- **वाचण प्रेरणा दिवस :**

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली १५ ऑक्टोंबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या जयंतीनिमीत्य वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांनी, विद्यार्थ्यांनी कलामांच्या जीवनातून आदर्श घेवून वाचन सवय अंगीकारावी असे मत व्यक्त केले. या प्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे यांनी वाचनाची सवय वृद्धीगत करुन आपले जीवन उज्ज्वल बनविण्याचे आवाहन केले. याप्रसंगी प्राध्यापक वृंद, महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वाचन प्रक्रियेत सहभागी होवून या माध्यमातून वाचन संस्कृती वृद्धींगत करण्याचा संदेश दिला.




वाचन प्रेरणा दिनानिमित्त
आयोजित कार्यक्रमात
वाचन करतांना
प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे

वाचन प्रेरणा दिनानिमित्त
आयोजित कार्यक्रमात
वाचन करतांना
महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद




- **राष्ट्रीय एकता दिवस :**

महाविद्यालयात प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांच्या उपस्थितीत सरदार वल्लभभाई पटेल ह्यांची जयंती तसेच माजी पंतप्रधान इंदीरा गांधी ह्यांच्या पुण्यतिथीनिमीत्त दि.३१ ऑक्टोंबर रोजी त्यांना अभिवादन करण्यात आले. ह्या प्रसंगी कोरोना नियमावलीचे पालन करुन प्रा.राहुल घेगे ह्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली.



कोरोना महामारी नियमावलीचे
पालनकरुन राष्ट्रीय एकता
दिनानिमित्त शपथ देतांना
प्रा.राहुल घुगे



- **एड्स विषयक जनजागृती :**

एड्स दिनानिमीत्य म्हणजेच दि.०१ डिसेंबर, २०२१ रोजी प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांच्या

अध्यक्षतेखाली एड्स विषयक जनजागृतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा.अमरिष गावंडे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रा.राहुल घुगे यांनी या प्रसंगी मार्गदर्शन करतांना बाळगायची सावधगीरी व आजारापासुन बचाव करण्यासाठी घ्यांवयाच्या दक्षतेबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांना सॅनिटाइझर आणि मास्कचे वाटप देखील करण्यात आले.

- **स्नेहानुबंध अभियान :**

कारोना महामारिच्या या काळात युवकांनी तसेच समाजाने जबाबदारीने पुढे येवून पिडीतांना मदत करणे आवश्यक आहे. या महामारिच्या काळात रक्ताचा तुटवडा खुप प्रकर्षाने जाणवला आणि म्हणून राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने गावागावत रक्तदान करण्यासंदर्भात दि.१५ ते २० डिसेंबर या कालावधीत जनजागृती करण्यात आली. रासेयो संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीद्वारा नामनिर्देशीत केलेले जनजागृतीपर बॅनर बनवून गावागावत तसेच दत्तक ग्रामातील चौकाचौकात अशा प्रकारचे बॅनर्स लावण्यात येवून रक्तदान मोठ्या प्रमाणात करण्यासंदर्भात जनतेला आवाहन करण्यात आले.

100



स्नेहानुबंध अभियानांतर्गत
जनजागृती करतांना
प्राध्यापक वृंद



स्नेहानुबंध अभियानांतर्गत
दत्तकग्राम धाबा येथे
जनजागृती करतांना

- **रस्ता सुरक्षा अभियान :**

''३२ वा रस्ता सुरक्षा अभियान'', ''सडक सुरक्षा जीवन रक्षा''

महाविद्यालयात प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे ह्यांच्या उपस्थितीत दि.१२.०२.२०२१ रोजी रस्ता सुरक्षा नियमांबद्दलचे मार्गदर्शन करण्यात आले. या प्रसंगी उपप्रादेशीक परिवहन अधिकारी श्री.विनोद जिजकार प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी ह्याप्रसंगी रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करणे कस आवश्यक आहे व त्यातून आपण आपले व

इतरांचे जीवन कसे सुरक्षीत करु शकतो यासंबंधी मार्गदर्शन केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करुन जनजागृती तसेच रस्त्याच्या दुतर्फा बाजुने येजा करणाऱ्या लोकांना वाहतूक नियमांचे पत्रके देखील वाटलीत.

रस्ता सुरक्षा अभियांतर्गत
आयोजीत कार्यक्रमात
मार्गदर्शन करतांना
प्रा.राहुल घुगे






रस्ता सुरक्षा अभियांतर्गत
नागरीकांना वाहन नियमावलीचे
पत्रक वितरीत करतांना
प्रा.राहुल घुगे व परिवह अधिकारी

- **मातृभाषा दिन साजरा :**

श्री.धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने मातृभाषा दिन साजरा करण्यात आला दि.२१.०२.२०२१ रोजी आयोजीत कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्या अध्यक्षस्थानी होत्या तर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.राहुल घुगे व मराठी विभाग प्रमुख प्रा.रेखा अढाव इत्यादी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.राहुल घुगे ह्यांनी केले तर प्रमुख मार्गदर्शक प्रा.रेखा अढाव ह्यांनी मातृभाषेचे महत्त्व विषद केले. प्राचार्य डॉ.संगीता लोहकपूरे ह्यांनी देखील ह्या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्रा.डॉ.सुरेश पंडित यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## श्रीधाबेकर कला महाविद्यालय, खडकी, अकोला
## वार्षिक अहवाल
## सत्र २०२१-२२

सत्र २०२१-२२ मध्ये मा. प्राचार्य डॉ संगीता लोहकपुरे यांच्या मार्गदर्शनात तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ नीता तिवारी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ सुरेश पंडित यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध कार्यक्रमाचे आणि उपक्रमांचे आयोजन महाविद्यालया मार्फत करण्यात आले. युवकांमध्ये देशप्रेम आणि सामाजिक जाणीव निर्माण व्हावी व राष्ट्राचा विकासाकरिता आवश्यक सशक्त युवकांचे निर्मिती करण्याच्या हेतूने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांच्या आणि उपक्रमांच्या वार्षिक अहवाल आपणाकडे सविनय सादर करीत आहे.

### ❁ राष्ट्रीय योग दिन साजरा ( २१ जून २०२१ )

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग दिनानिमित्त सार्वजनिक स्तरावर कार्यक्रम शक्य नसल्यामुळे शासनाच्या नियमानुसार योग दिन साजरा करावयाच्या असल्यामुळे दिनांक 21 जून 2021 रोजी सर्व स्वयंसेवकांना ऑनलाइन पद्धतीने घरीच योग करण्याचे सांगण्यात आले आणि महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमात आपले योगदान दिले.

### ❁ लसीकरण शिबिराचे आयोजन व मास्क वाटप

व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या कार्यक्रमात आपले योगदान दिले.

### ❀ लसीकरण शिबिराचे आयोजन व मास्क वाटप कार्यक्रम ( ३० आक्टोंबर २०२१ )

श्री धाबेकर कला महाविद्यालयात covid-19 प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिराचे आयोजन दिनांक 30 ऑक्टोबर 2019 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि मिशन युवा स्वास्थ्य यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. सदर शिबिर उद्धाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे, श्री शंकरराव लंगोटे,सुरेंद्रभाऊ हुंडीवाले आणि वैद्यकीय अधिकारी टीम मध्ये डॉ भूषण कोरडे, श्री संजय वाघेला उपस्थित होते. यांचे सर्वांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेच्या पुजनाने करण्यात आली. कार्यक्रम अधिकारी डॉ. नीता तिवारी यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आपल्या प्रास्ताविका मधून स्पष्ट केली आणि प्राचार्य ड़ॉ.संगीता लोहकपुरे यांनी लसीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवुन देत लस घेण्यासाठी प्ररित केले. १८ वर्षावरील विद्यार्थ्यांसाठी मिशन युवा संस्था अंतर्गत covid-19 लसीकरण संदर्भात निर्देश प्राप्त केले आहेत. याचा लाभ सर्वांनी  घ्यावा असे आवाहन केले. परिचारिका श्री नाईक मॅडम आणि श्रीनिलेश पवार यांनी लसीकरणाची जवाबदारी यशस्वीपणे पार पाडली. या लसीकरणासाठी खुप विद्यार्थी उपस्थित होते. सदर लसीकरण शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना सेवकांनी अथक परिश्रम घेतले. सहाय्यक अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.





व्हॅक्सिनेशन शिबिराच्या उद्घाटन करताना

व्हॅक्सिनेशन टीमचा स्वागत करताना





व्हॅक्सिनेशन संदर्भात मार्गदर्शन करताना








पंधरा वर्षाच्या वर विद्यार्थ्यांसाठी व्हॅक्सिनेशन शिबिर


श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर
कनिष्ठ महाविद्यालय






ार्यक्रम दुसरी लसीकरण शिबिर

तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुरेश पांडे यांनी केले.

### ֍ महाविद्यालयात द्वितीय लसीकरण शिबिराचे आयोजन ( १३ जानेवारी २०२२ )


सहभागी - 100

श्री धाबेकर कला महाविद्यालयात 13 जानेवारी रोजी covid-19 लसीकरण शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय वयोगट पंधरा वर्षावरील विद्यार्थ्यांसाठी व सर्व नागरिकांसाठी महाविद्यालयात लसीकरण शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातर्फे आरोग्य विभागाचे सर्व कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन शब्द सुमनाने स्वागत केले. विद्यार्थ्यांमध्ये असलेली लसीकरण विषयी भीती व भ्रांती दूर करण्यासाठी डॉ. प्रज्ञा खंडेराव मॅडम यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला व योग्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले व लसीकरण साठी प्रोत्साहित केले. तसेच प्रा श्रीकांत पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. डॉ संतोष मिसाळ यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी व खडकी परिसरात राहणाऱ्या नागरिकांनीही लस घेऊन कार्यक्रमाला उत्सफुर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला वैद्यकीय अधिकारी श्री संजय डाबेराव, डॉ. प्रज्ञा खंडेराव, परिचारिका श्री नाईक मॅडम यांनी लसीकरणाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सदर लसीकरण शिबिराच्या यशस्वितेसाठी सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले व प्रा. स्वाती फाले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांना चहा, नाश्ता, बिस्किट वाटप करण्यात आले. 100

## ❁ मतदार जनजागृती अभियान कार्यक्रम सहभागी - १५

श्री धाबेकर कला महाविद्यालय, खडकी, अकोला येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे मतदान जनजागृती कार्यक्रम १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर पर्यंत आयोजित करण्यात आले. मतदान जनजागृती अभियान कार्यक्रमाअंतर्गत खडकी परिसरात मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. सर्वप्रथम

कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. निता तिवारी यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांच्या द्वारे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मतदान यादीत नावनोंदणी करीता सूचना देण्यात आल्या. तसेच अठरा वर्षाचे वरील विद्यार्थ्यांना आपल्या नावाची नोंदणी करिता लागणारे कागदपत्रांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. नव मतदार नोंदणी संबंधी ऑनलाईन नोंदणी व ऑफलाईन नोंदणी अशा दोन्ही पद्धती पैकी ऑनलाइन पद्धतीने कशा प्रकारे नोंदणी करता येते या संदर्भात सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सर्व प्राध्यापक उपस्थित होते व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना चे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी केले.




मतदान नोंदणी अभियान व्याख्यान कार्यक्रम आभासी पद्धति द्वारे

### ❁ संविधान दिवस साजरा ( २६ नोव्हेंबर २०२२ )

श्री धाबेकर कला महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे तर प्रमुख अतिथी म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष मिसाळ उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. संगीता लोहकपुरे यांनी विद्यार्थ्यांना संविधानाची माहिती करून दिली. प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांनी आपल्या भाषणात सांगितले संविधानामुळे आपण स्वतंत्र श्वास घेत आहोत संविधानातील अनेक कलमा व विविध उदाहरणे देऊन त्यांनी मूलभूत अधिकार संदर्भात विद्यार्थ्यांना विस्तृतपणे माहिती दिली आणि संविधानाच्या उद्देश सांगितला अशाप्रकारे आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अर्पिता चांदुरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. दीपा शिरसाट यांनी केले. या कार्यक्रमात रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात उपस्थित होते.

98

### ❁ माझी वसुंधरा संरक्षण कार्यक्रम संपन्न (व्याख्यान ) ( २८ डिसेंबर २०२१ ) सहभागी -95

श्री धाबेकर कला विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वारने माझी वसुंधरा संरक्षण वर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक प्रा रेखा आढाव होत्या, त्यांनी विद्यार्थ्यांना पावसाळ्यात प्रत्येकाने किमान एक झाड लावावे व त्याचे संगोपन असे आवाहन केले. या कार्यक्रमात झाडे लावा झाडे जगवा असा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. अर्पिता चांदुरकर यांनी केला. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आभार कु.कल्याणी लुले यांनी मानला.





माझी वसुंधरा संरक्षण कार्यक्रम

महाविद्यालय, मंदिर, शासकीय कार्यालय आदि परिसरात वृक्षारोपण केले.

**श्री धावेकर कला महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी ( ३ जानेवारी २०२२ )**

श्री धावेकर कला महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले. स्त्री विषयक शिक्षा व लिंगभाव समानता व सरकारद्वारे मुलींची वय एकवीस वर्ष उचित वा अनुचित या विषयावर चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमात कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. राहुल


घुगे यांनी केला कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक प्रा. स्वाती फाले मॅडम होत्या. त्यांनी स्त्री शिक्षा संदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी स्त्री शिक्षा आणि लिंगभाव समानता या विषयावर आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांनी दिला. कु आरती सरदार, कु. अर्पिता चांदूरकर, कु. मयुरी पातुर्डे, कु. आंचल ठाकूर यांनीही स्त्री शिक्षा संदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मोठया संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमात आभार प्रदर्श प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांनी केला.




सावित्रीबाई फुले जयंती


## ❀ रा. से. यो.च्या वतीने राष्ट्रीय युवा दिन व जिजाऊ जयंती साजरी ( १२ जानेवारी २०२२ )

श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय युवा दिन व जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे उपस्थित होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. श्रीकांत पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम स्वामी विवेकानंद व जिजाऊ यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली आणि शब्द सुमनाने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या संचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. निता तिवारी यांनी केला. प्रमुख मार्गदर्शन प्रा. श्रीकांत पाटील यांनी युवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकाळ संदर्भात परिचय करून दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांनी मार्गदर्शन करतांना स्वामी विवेकानंद व माँ जीजाऊ यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल वानखडे तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी केले.




स्वामी विवेकानंद जयंती साजरी करताना






सावित्रीबाई फुले जयंती निमित्त पुजन करतांना

## ❀ महाविद्यालयात द्वितीय लसीकरण शिबिराचे आयोजन ( १३ जानेवारी २०२२ )

श्री धाबेकर कला महाविद्यालयात 13 जानेवारी रोजी covid-19 लसीकरण शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय वयोगट पंधरा वर्षावरील विद्यार्थ्यांसाठी व सर्व नागरिकांसाठी महाविद्यालयात लसीकरण शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातर्फे आरोग्य विभागाचे सर्व कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन शब्द सुमनाने स्वागत केले. विद्यार्थ्यांमध्ये असलेली लसीकरण विषयी भीती व भ्रांती दूर करण्यासाठी डॉ. प्रज्ञा खंडेराव मॅडम यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला व योग्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले व लसीकरण साठी प्रोत्साहित केले. तसेच प्रा श्रीकांत पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. डॉ संतोष मिसाळ यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी व खडकी परिसरात राहणाऱ्या नागरिकांनीही लस घेऊन कार्यक्रमाला उत्सफुर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला वैद्यकीय अधिकारी श्री संजय डाबेराव, डॉ. प्रज्ञा खंडेराव, परिचारिका श्री नाईक मॅडम यांनी लसीकरणाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सदर लसीकरण शिबिराच्या यशस्वितेसाठी सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले व प्रा. स्वाती फाले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. विद्यार्थ्यांना चहा, नाश्ता, बिस्किट वाटप करण्यात आले.






अठरा वर्षाच्या वर नागरिकांसाठी पहिला व्हॅक्सिनेशन शिविर


### ❁ मकर संक्रांति पर्वावर जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे आयोजन ( १४ जानेवारी २०२२ )

श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने मकर संक्रांति पर्वावर जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे आयोजन कोविड निर्बंधाचे पालन करून आभासी पद्धतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी 50 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सदर कार्यक्रम हा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. तसेच या कार्यक्रमाला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी, प्रा. डॉ. सुरेश पंडित, प्रा. डॉ. अमरीश गावंडे उपस्थित होते.



ना    योग दिनानिमित्त सूर्यनमस्कार करताना

स्वामी विवेकानंद जयंती साजरी करताना



१४ जानेवारी रोजी आभासी पद्धतीने सूर्यनमस्कार करताना

## ❀ श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस संपन्न ( २५ जानेवारी २०२२ )

स्थानिक अकोला श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मतदार दिवस संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी व्यासपीठावर उपस्थित होत्या. राष्ट्रीय मतदान दिवसानिमित्त महाविद्यालयात ऑनलाईन निबंध स्पर्धेच्या आयोजन करण्यात आला होता. या निबंध स्पर्धेमध्ये १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी केला. त्यांनी राष्ट्रीय मतदार साजरा करण्यामागचा निवडणूक आयोगाच्या उद्देश्य आणि लोकशाहीत मतदार हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून घटना समितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या अथक प्रयत्नांनी स्त्री-पुरुष घटकातील अठरा वर्षाच्या वर असलेल्या प्रत्येक नागरिकांना आपले मतदानांचे उपयोग योग्य उमेदवार निवडताना केले पाहिजेत असे आपले मत मांडले आणि राष्ट्रीय मतदान दिवसाची माहिती देऊन प्रतिज्ञा दिली. त्यामध्ये आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की आपल्या देशाच्या लोकशाही परंपरेचे जतन करून आणि मुक्त, निपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य ठेवुन व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करू अशी शपथ देण्यात आली. याप्रसंगी डॉ. संगीता लोहकपुरे यांनी अध्यक्षीय भाषण देताना सांगितले निवडणूक प्रक्रियेत आपला नेता निवडतांना मतदाराने विचारपूर्वक समाजाच्या राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याचा वेध घेऊन मतदान करावे आणि मतदार नोंदणी साठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कल्याणी लुले तर आभार प्रदर्शन अमोल पाखरे यांनी केले निबंध स्पर्धेच्या निकाल नंतर घोषित केला जाईल कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संलग्नित

श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशिय मंडळ द्वारा संचालित

## श्री धाबेकर कला महाविद्यालय, खडकी, अकोला

## राष्ट्रीय सेवा योजना

25 जानेवारी राष्ट्रीय मतदार दिवस निमित्ताने आयोजित

### महाविद्यालय स्तरीय निबंध स्पर्धा

विषय – १.राष्ट्रीय मतदान एक कर्तव्य

२.भारतीय लोकशाही

१. निबंध सुवाच्य अक्षरात पेपरच्या एका बाजूने पुरेसा समास सोडून लिहिलेला असावा.

२. निबंध 1500 शब्द पेक्षा जास्त नसावा.

३. निबंध मराठी,हिंदी किंवा इंग्रजी या पैकी कोणत्याही भाषेत लिहिता येईल.

४. निबंधाच्या वरती स्वतःचे नाव, मोबाइल नंबर, वर्ग आणि विद्यालयाचे नाव स्पष्ट अक्षरात लिहावा.

५. निबंध लिहून,फोटो काढून 9923036126 या व्हाट्सअप नंबरवर दिनांक 25 जानेवारी 2022 पर्यंत पाठवावा.

६. भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

प्रा.डॉ.नीता तिवारी
रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी

प्रा.डॉ.सुनिता पाटील
रा.से.यो.सह.कार्यक्रम अधिकारी

डॉ. ज्योतिष लोहकपुरे
प्राचार्य







मतदार दिना निमित्त शपथ ग्रहण करतांना

## ❀ लोकशाही पंधरवडा ( ९ फेब्रुवारी २०२२ )

श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व अर्थशास्त्र विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 26 जानेवारी ते 10 फेब्रुवारी या कालावधीमध्ये राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र "लोकशाही पंधरवडा" या विषयावर आधारित "लोकशाही आणि मतदानाचा हक्क" या विषयावर आभासी पद्धतिने व्याख्यानाचे आयोजन दिनांक 09-02-2022 रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे व प्रमुख मार्गदर्शक राज्यशास्त्र विभाग प्रमुख एवं सहयोगी एनसीसी अधिकारी आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे, अमरावती चे प्रा. अमोल भाऊरावजी बंड सर लाभले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी केला. मान्यवरांचा परिचय राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांनी केला. प्रा.

अमोल बंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नवीन मतदार जनजागृती साठी लोकशाही पंधरवडा मध्ये महाविद्यालयीन पातळीवर निबंध स्पर्धा व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी केले.

**मतदार जनजागृती चे घोषवाक्य**

1. हम भारत के मतदाता है देश हमारी शान है.
2. लोकतंत्र हमको प्यारा है ये सब का अभिमान है.
3. वोट अधिकारच नाही तर कर्तव्य सुद्धा आहे.
4. सोडा आपले सर्व काम चला करू आपले मतदान.
5. तोच देश होईल महान ज्या देशात शंभर टक्के मतदान.






मतदार जनजागृती कार्यक्रम आणि रॅली





मतदार नाव नोंदणी कार्यक्रम





मतदार जनजागृती कार्यक्रम


## संत गाडगेबाबा जयंती साजरी ( २३ फेब्रुवारी २०२२ )

श्री धाबेकर कला महाविद्यालयाच्या वतीने बुधवार दिनांक 23 फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय सेवा योजना व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संतोष मिसाळ सर होते तर प्रमुख अतिथी प्रा. राहुल घुगे सर हे होते. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि संत गाडगेबाबांच्या जीवनाच्या निमित्ताने गाडगेबाबांनी जी दशसूत्री सूत्रे सांगितले होते तिचे वाचन करण्यात आले. गाडगेबाबांनी स्वतःला लोक कल्याणासाठी अर्पण केले होते. रूढी परंपरा, प्रथा, अंधविश्वास, चमत्कार या विचारांच्या गाडगेबाबांनी सतत विरोध केला होता. प्रमुख मार्गदर्शक प्रा. राहुल घुगे यांनी सांगितले की भारताला स्वच्छतेची शिकवण देणारे, अमरावती विद्यापीठाला त्यांचे नाव देण्यात आले. संत गाडगे महाराज विज्ञान आणि आर्थिक दृष्टिकोन असलेले प्रसिद्ध एक समाज सुधारक होते आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांनी ही संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या दिवशी दोन्ही विभागाकडून गरिबांना अन्न व फळ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कल्याणी लुले यांनी केले तर आभार प्रदर्शन अमोल पाखरे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## ॐ ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिवस वक्तृत्व स्पर्धा

श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 8 मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संगीता लोहकपूरे व प्रमुख अतिथी म्हणून डॉ प्रा रंजना जोशी हे होत्या.प्रा रेखा आढाव, प्रा स्वाती फाले, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ निता तिवारी मंचावर उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ नीता तिवारी यांनी महिला दिवसाची पार्श्वभूमी, घर सांभाळून आज महिला विविध उद्योग व्यवसायामध्ये पुढे येत आहे आणि प्रवक्त्या डॉ रंजना जोशी यांनी मुलींना सावित्रीबाई फुले यांच्या आदर्श घेऊन त्यांच्या तत्त्वाचा

अंगीकार करून जीवनात कार्य करावे असे मत मांडले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ संगीता लोहकपुरे यांनी सांगितले की आजच्या स्त्रीला किती वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटवता येतो हे या स्पर्धेमधून सर्वासमोर मांडला आहे.स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा स्वाती फाले व प्रा रेखा आढाव यांनी काम पाहिले. या स्पर्धेत प्रथम स्थान प्रांजली कवरे व द्वितीय स्थान ज्ञानेश्वरी वानखडे यांनी पटकावला आणि यावेळी सर्व विद्यार्थिनी स्वयम् सेविकांच्या पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.



# आठ मार्च रोजी आयोजित कार्यशाळा मध्ये उपस्थिती

## बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी ( १४ एप्रिल २०२२ )

श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा डॉ संतोष मिसाळ व प्रमुख वक्ते प्रा डॉ संदीप डोंगरे सर, कला व वाणिज्य महाविद्यालय येवदा, तालुका दर्यापूर, जिल्हा अमरावती व कार्यक्रमाचे आयोजक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ नीता तिवारी उपस्थित होत्या. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त भारतीय संविधान या विषयावर डॉ संदीप डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ संतोष मिसाळ यांनी अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा डॉ सुरेश पंडित यांनी तर आभार प्रदर्शन कु. आम्रपाली खंडारे यांनी केले.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ नीता तिवारी व सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन सत्र २०२० - २०२१ या कालावधीमध्ये करण्यात आले होते. त्याचा सविस्तर अहवाल आपणाकडे सविनय सादर करित आहो.





बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अमृत महोत्सव भारतीय संविधान व्याख्यानाचा कार्यक्रम





मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते डॉ संदीप डोंगरे

जनमाध्यम


www.janmadhyam.com सोमवार, १३ डिसेंबर २०२१

# श्री धाबेकर कला महाविद्यालयात मतदान जनजागृती कार्यक्रम

■ प्रतिनिधी । अळोला ■

स्थानिक खडकी येथील श्री धाबेकर कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे आयोजित मतदार नाव नोंदणी आणि जनजागृति विशेष मोहीम नुकतीच राबविण्यात आली. सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संगीता लोहकपुरे यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.नीता तिवारी यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.मुख्य निवडणूक आयोग व शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांकरिता हा मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात मुख्य उपस्थिती म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष मिसाळ प्रा. डॉ. सुरेश पंडित प्रा. डा.अमरीश गावंडे उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना भारतीय लोकशाही मध्ये मतदानाचे महत्त्व ,मतदाराची कर्तव्य यावर प्रा.डॉ.अमरीश गावंडे यांनी प्रकाश टाकले.



प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांनी १८ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मतदार यादीत नोंदणी करिता सूचना दिल्या व मतदार यादीत नाव नोंदणी करिता लागणारे कागदपत्रांची माहिती देण्यात आली. मतदार नोंदणी संबंधी ऑनलाईन व ऑफलाईन नोंदणी अशा दोन्ही पद्धती पैकी ऑनलाईन पद्धतीने कशाप्रकारे नोंदणी करता येते या विषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांनी दिले.


कार्यक्रमाच्या आभार प्रा. डॉ.सुरेश पंडित यांनी मानला.या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे स्वयंसेवक व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

जनमाध्यम
www.janmadhyam.com
अकोला । शुक्रवार, दि. २४ डिसेंबर २०२१

# श्री धाबेकर कला महाविद्यालयात संत गाडगे बाबा पुण्यतिथी साजरी

■ प्रतिनिधी । अकोला ■

श्री धाबेकर कला महाविद्यालय खडकी अकोला येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागा द्वारे संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या पूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संगीता लोह कपुरे यांनी अध्यक्षस्थान भूषविले तर प्रमुख वक्ते म्हणून माजी क्षेत्रीय समन्वयक प्रा. डॉ. अमरीश गावंडे सर उपस्थित होते. यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना म्हणाले गाडगेबाबांनी अज्ञानता, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी खूप तळमळीने कार्य



केले. ते खूप मोठे समाज सुधारक होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक राहुल घुगे सर उपस्थित होते. त्यांनीही आपले विचार व्यक्त करताना सांगितले की गाडगेबाबा स्वच्छतेचा मूलमंत्र देणारे पहिले समाज सुधारक होते. संत गाडगेबाबा प्रमाणे आपण सर्वांनी कर्म केले पाहिजे, असे विचार प्रस्तुत केले. तर अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. संगीता लोहकपुरे यांनी संत गाडगेबाबा हे मानवतावादी व वैज्ञानिक दृष्टिकोन देणारे एक महान संत होते. ते आपले दीन दलित व पीडितांच्या सेवेमध्ये आपले संपूर्ण आयुष्य व्यतीत करणारे संत मधील सुधारक आणि सुधारक मधील संत होते. असे विचार प्रस्तुत केले. कार्यक्रम संपल्यानंतर महाविद्यालय परिसरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले व स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. नीता तिवारी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी मानले. या वेळेवर बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

जनमाध्यम
www.janmadhyam.com
अकोला
बुधवार, ०३ नोव्हेंबर २०२१

# श्री धाबेकर कला महाविद्यालयात लसीकरण शिबिराचे आयोजन



**प्रतिनिधी । अकोला**


श्री धाबेकर कला महाविद्यालयात खडकी अकोला येथे दिनांक ३० /१०/२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि मिशन युवा स्वास्थ अंतर्गत यांच्या संयुक्त विद्यमाने म्दन्-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले सदर शिबिर उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संगीता लोहकपुरे ,श्री शंकरराव लंगोटे , श्री सुरेंद्र भाऊ हुंडीवाले आणि वैद्यकीय अधिकारी टीम मध्ये डॉक्टर भूषण कोरडे श्री संजय डाबेराव उपस्थित होते यांचे सर्वांचे स्वागत करण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली कार्यक्रम अधिकारी डॉ नीता तिवारी यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आपल्या प्रस्ताविक मधून स्पष्ट केली आणि प्राचार्य , डॉक्टर संगीता लोहकपुरे यांनी लसीचे महत्त्व विद्यार्थी यांना पटवून देत लस घेण्यासाठी प्रेरित केले, १८ वर्षावरील विद्यार्थ्यांच्या साठी मिशन युवा संस्था अंतर्गत म्दन्-१९ लसीकरण संदर्भात निर्देश प्राप्त केलेले आहेत त्यांच्यात एक प्रकार म्हणून श्री धाबेकर कला महाविद्यालय खडकी येथे शिबिर राबवण्यात येत आहे यांच्या लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन केले परिचारिका नाईक मॅडम आणि श्री निलेश पवार यांनी लसीकरणाची जबावदारी यशस्वीपणे पार पाडली या लसी करण्यासाठी खुप विद्यार्थी उपस्थित होते सदर लसीकरण शिबिराच्या यशस्वितेसाठी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना सेविकांनी अथक परिश्रम घेतले साहाय्यक अधिकारी प्राध्यापक डॉ सुरेश पंडित यांनी कार्यक्रमा चे सुत्र संचालन केले आणि प्रा राहुल घुगे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले

जनमाध्यम अकोला
www.janmadhyam.com
रविवार, ०६ फेब्रुवारी २०२१

# श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस

■ प्रतिनिधी । अकोला ■

स्थानिक -अकोला श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना च्या वतीने मतदार दिवस संपन्न करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉक्टर संगीता लोहकपुरे व राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ नीता तिवारी व्यासपीठावर उपस्थित होते, राष्ट्रीय मतदार दिवस निमित्त महाविद्यालयात ऑनलाईन निबंध स्पर्धेचा ही आयोजन करण्यात आला होता या निबंध स्पर्धेमध्ये १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला कार्यक्रमांचे प्रास्ताविक प्रा. डॉ नीता तिवारी यांनी केले त्यांनी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याचा निवडणूक आयोगाच्या उद्देश आणि लोकशाही तर मतदान हा अत्यंत



महत्त्वाचा घटक असून घटना समितीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या अथक प्रयत्नांनी स्त्री-पुरुष घटकातील १८ वर्षाच्या वर असलेल्या प्रत्येक नागरिकांना आपले मतदारांचे उपयोग योग्य उमेदवार निवडताना केले पाहिजे असे आपले मत व्यक्त केले आणि राष्ट्रीय मतदान दिवसाची माहिती देऊन प्रतिज्ञा दिली त्यामध्ये आम्ही भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की आपल्या देशांचा लोकशाही परंपरा यांचे जतन करून आणि मुक्त निश पक्षातील व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य दाखवावा व प्रत्येक निवडणूक निभय्यपणे तसेच धर्म वंश जात समाज भाषा या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करून अशी शपथ घेण्यात आली यावेळी डॉक्टर संगीता लोहकपुरे यांनी अध्यक्षीय भाषण देताना सांगितले निवडणूक प्रक्रियेत आपला नेता निवडताना मतदाराने विचारपूर्वक समाजाच्या राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याच्या वेध घेऊन मतदान करावे आणि मतदार नोंदणी साठी सहकार्य करावे असे आवाहन केले कार्यक्रमाच्या सूत्रसंचालन कुमारी कल्याणी लुले तर आभार प्रदर्शन अमोल पाखरे यांनी केले निबंध स्पर्धेचे निकाल नंतर घोषित केले जाईल असी घोषणा करण्यात आली कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

जनमाध्यम

www.janmadhyam.com


शनिवार, दि. २९ जानेवारी २०२[illegible]

# श्री धाबेकर कला महाविद्यालयात लसीकरण शिबीराचे आयोजन

■ प्रतिनिधी । अकोला ■

श्री धाबेकर कला महाविद्यालयात १३ जानेवारी रोजी covid-19 लसीकरण शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व श्रीमती लक्ष्मीबाई धाबेकर कनिष्ठ महाविद्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील १५ वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी व सर्व नागरिकांसाठी महाविद्यालयात लसीकरण शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये असलेली लसीकरणाविषयी भीती व भ्रांती दूर करण्यासाठी



डॉक्टर प्रज्ञा [illegible] यांनी विद्यार्थ्यांच्या सोबत संवाद साधला व योग्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संगीता [illegible] यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले व लसीकरणासाठी प्रोत्साहित केले. [illegible] व [illegible] यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. [illegible] मिश्रा यांनी केले.

कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. [illegible] तिवारी यांनी केले.

• दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी स्वच्छतेतून समृद्धीकडे या पथनाट्याचे सादरीकरण

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव पर्वा वर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. स्वच्छतेतून समृद्धीकडे हा या पथनाट्याचा विषय होता. पथनाट्य महाविद्यालयाच्या प्राचार्या तथा राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. निता तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली व पुरुष कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. ही पथनाट्याची संकल्पना महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. निता तिवारी यांची होती. या पथनाट्याच्या साजरी करणात निखिल जामोदे, कु गायत्री तायडे, कैलास पतोड, प्रियदर्शनी दामोदर, निकिता मानके, अमिन पहुरकर, कृष्णा पारधी, राहुल जव सायली मानके, पोर्णिमा जाधव, वैष्णवी मेंढे, या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या पथनाट्याच्या माध्यमातून अस्वच्छतेचे दुष्परिणाम, स्वच्छतेचे फायदे काय आहेत त्या संदर्भात समाजात जनजागृती करण्याचा उद्देश होता. या उत्कृष्ट साजरी करण्याबद्दल सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. या उत्तम सादरीकरणाबद्दल सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले या कार्यक्रमात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच कार्यक्रमाच्या यशस्वितेवारिता महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानण्यात आले.




अमृत महोत्सव निमित्त पथनाट्य सादर करतांना विद्यार्थी

- **दि. ११ ऑगस्ट २०२२ रोजी निबंध स्पर्धा आयोजन**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव पर्वावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयात दिनांक ११ ऑगस्ट २०२२ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही निबंधस्पर्धा महाविद्यालयाच्या प्राचार्या व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. नीता तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. सुरेश पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या निबंध स्पर्धेच्या अटी व नियम राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी समजावून सांगितल्या. या स्पर्धेला परीक्षक म्हणून प्रा. रेखा आढाव व प्रा. सिद्धार्थ पाटील हे लाभले होते. निबंध स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे होते. निबंध स्पर्धेचे विषय खालीलप्रमाणे होते-

- मेरा भारत महान
- स्वातंत्र्यलढ्यात महिलांचे योगदान
- भ्रष्टाचार निर्मूलन काळाची गरज़
- जातियवाद निर्मूलन काळाची गरज
- स्त्री सक्षमीकरण काळाची गरज

या स्पर्धेत सहभागी झालेल्या एकूण नऊ विद्यार्थ्यांमध्ये धम्मपालं उपरवट, पौर्णिमा जाधव व गायत्री तायडे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धच्या यशस्वितेकरिता महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. या स्पर्धेची सांगता सर्वांचे आभार मानून करण्यात आली.

• दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रध्वजाचे वितरण

हर घर तिरंगा या अभियानाच्या यशस्वितेकरिता तसेच जागृती करीता महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने प्रवेशित विद्यार्थी व महाविद्यालय परिसरातील नागरिकांना मोफत राष्ट्रध्वजाचे वितरण करण्यात आले. हे वितरण महाविद्यालयाच्या प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.नीता तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. सुरेश पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या उपक्रमाच्या यशस्वितेकरिता महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले. याप्रसंगी राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये यासाठी कोणती

काळजी घ्यावी याविषयी ध्वजसंहिता समजावून सांगण्यात आली. राष्ट्रध्वज प्राप्त झालेल्या नागरिकानी व विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही असा याप्रसंगी संकल्प व्यक्त केला.

- **दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी रांगोळी स्पर्धा**




महाविद्यालयात आजादी अमृतमहोत्सवानिमित्त तिरंगा वाटप कार्यक्रम

## • दि. १२ ऑगस्ट २०२२ रोजी रांगोळी स्पर्धा

महाविद्यालयात स्वातंत्र्याच्या ७५व्या अमृत महोत्सवावर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीता तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेश पंडित यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर भाषण डॉ. सुरेश पंडित यांनी करताना क्रांती दिनाचे महत्त्व विशद करून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या हर घर तिरमा या उपक्रमाची माहिती दिली. तसेच या पर्वावर आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धेच्या संदर्भातील नियमावली समजावून सांगितली. या स्पर्धेत एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात राहुल गवई, अमित पहुरकर, निकिता मानके, गायत्री तायडे, पूर्णिमा जाधव, धम्मपाल उपरवट, निखिल राठोड, वैष्णवी मुंढे, लक्ष्मी सहारे, सलोनी सुरडकर, सायली मानके आदिचा समावेश होता. यात कु. निकिता मानके, गायत्री तायडे व पौर्णिमा जाधव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार पटकाविला. स्पर्धेच्या शेवटी पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना गौरवान्वित करण्यात आले. स्पर्धेची सांगता सर्वाचे आभार मानून राष्ट्रगीताने करण्यात आली. या स्पर्धच्या यशस्वितेकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सीताबाई महाविद्यालय, अकोला येथे जिल्हास्तरीय रागोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या कु. सायली मानके, कु. पौर्णिमा जाधव, कु मायत्री तायडे व कु. निकिता मानके ह्या मुली सहभागी झाल्या होत्या. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या पथकाचे नेतृत्व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. निता तिवारी यांनी केले होते.




महाविद्यालयात महाविद्यालयीन रांगोळी स्पर्धा



जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धा मध्ये तृतीय स्थान प्राप्त
झाल्यानंतर पुरस्कार घेताना विद्यार्थिनी

कार्यक्रम अधिकारी डॉ. निता तिवारी यांना केले होते.

- **दि. १३ ऑगस्ट २०२२ रोजी जिल्हा स्तरीय रैली**

शासन आणि विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने हर घर तिरंगा व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी याकरिता जिल्हास्तरीय रॅलीचे आयोजन करावे या आवाहनानंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. रतनलाल येऊल सर याच्या प्रमुख मार्गदर्शन व उपस्थितीत आपल्या महाविद्यालयातील सर्व प्रा. व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व स्वयंसेविका तसेच राष्ट्रीय सेवा योजना महिला व पुरुष कार्यक्रम अधिकारी उपस्थितीत हजर होते.

या भव्य आणि ऐतिहासिक रॅलीच्या यशस्वितेकरिता आमच्या महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले. यानंतर पथनाट्य सादरीकरणाच्या उपक्रमांमध्ये सुद्धा स्वयंसेवकांनी आपल्यामुळे योगदान व उपस्थिती दर्शविली.

व्यसन मुक्ती शपथ ग्रहण कार्यक्रम



हर घर तिरंगा जिल्हास्तरीय रॅली



हर घर तिरंगा जिल्हास्तरीय रॅलीमध्ये सहभागिता



हर घर तिरंगा जिल्हास्तरीय रॅलीमध्ये सहभागिता

अधिकारी डॉ. निता तिवारी आणि पुरुष कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी दिल

- **दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी ध्वजारोहण / वृक्षारोपण / तिरंगा जनजागृती रॅली**

१५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण करण्यात आले. या ध्वजारोहणाला प्रा. डॉ. चव्हाण, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोरगाव हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. हा ध्वजारोहणाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीता तिवारी ह्याच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्यां तसेच प्रमुख अतिथी सन्माननीय चव्हाण सर यांनी शुभेच्छापर संदेश दिला.

यानंतर प्रमुख अतिथी आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीता तिवारी यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनात महाविद्यालय परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबविण्यात आला. येथे उपस्थित राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकानी वृक्षारोपणा बरोबर वृक्ष संवर्धनाच्या मानस व्यक्त केला.

नंतर उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाच्या समावेश असलेल्या विशाल रैलीचे आयोजन खडकी परिसरात करण्यात आले. या रैली मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्यों, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. रॅलीला उत्तम प्रतिसाद मिळत असतांनाच पावसाचा जोरदार हजेरीमुळे रॅलीची सांगता करण्यात आली.

शेवटी सर्वांचे आभार मानून या विविधांगी उपक्रमाची सांगता करण्यात आली.

मार्गदर्शन करताना मान्यवर




ार्यक्रम

घरघर तिरंगा रॅली १५ ऑगस्ट

आभार मानून या विविधांगी उपक्रमाची सांगता करण्यात आली.

## • दि. ५ सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षक दिन साजरा

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती निमित्ताने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना च्या वतीने शिक्षक दिनाच्या हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. निता तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा. राहुल घुगे हे तर या प्रसंगी प्रा. डॉ. सुरेश पंडित हे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी शिक्षक दिनाच्या प्रासंगीकते वर प्रकाश टाकून राष्ट्रीय सेवा योजनेच्या भूमिकेचे महत्त्व विशद केले. प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले प्रा. राहुल घुगे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना "शिक्षकांमुळेच समाजोन्नती" हे आपले विधान सोदाहरण पटवून दिले. आपल्या अध्यक्षीय विचारातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीता तिवारी यांनी माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून भारताच्या आधुनिकतेत शिक्षक व राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या निखिल राठोड, शरद इंगळे, कु. प्रणाली उपरवट कु. प्रेरणा

गवारगुरु यांनीही आपली मते मनोगतातून व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.पूजा वस्त्रकार व आभारप्रदर्शन कु. पद्मा सरदार यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित होते.

- **दि २४ सेप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस कार्यक्रम संपन्न**

दि २४ सप्टेंबर रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनानिमित्त कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीता तिवारी ह्या होत्या. तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. अशोक वाहुरवाघ म्हणून लाभले होते. याप्रसंगी प्रा. डॉ. सुरेश पंडित व प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजन, दशसुत्री चे वाचन व राष्ट्रीय सेवा योजना गीताने करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजना काय आहे, या राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या इतिहास आपल्या प्रास्ताविकातून सांगितला. प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले डॉ. अशोक वाहुरवाघ यांनी राष्ट्रीय सेवा योजना व्यक्तिमत्त्वाला कलाटणी देण्याचे माध्यम होय, हे आपले मत पटवून देताना राष्ट्रीय सेवा योजना च्या विषयी विविध उपक्रमांमुळे जे संस्कार केले जातात त्यामुळे ज्ञान वर्धन, समाजोपयोगी कार्याची आवड, कौशल्य विकास होऊन व्यक्तिमत्त्वाला कलाटणी मिळून सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो हे अनेक उदाहरणांनी पटवून दिले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीता तिवारी यांनी आपल्या अध्यक्षीय विचारातून उन्नत भारतासाठी आणि राष्ट्राला महाशक्ती म्हणून बहुमान प्राप्त करून देण्यासाठी “माझ्यासाठी नव्हे तुमच्यासाठी” हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीद आत्मसात करून समाजकार्य, देश कार्यात स्वतःला झोकून द्या हा मोलाचा संदेश राष्ट्रीय योजना स्वयंसेवकांना दिला. कार्यक्रमाच्या अंती वृक्षारोपण व परिसर स्वच्छतेचे कार्य करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मयुरी पातुर्डे तर कु. अंकिता नरडे यांच्या आभाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.






राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम





• **दि. २ ऑक्टोबर२०२२ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती आयोजन**


राष्ट्रीय सेवा योजना च्या वतीने दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती पर्वावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीता तिवारी प्रवक्ते म्हणून प्रा. डॉ. संतोष मिसाळ हे तर प्रा. डॉ. सुरेश पंडित हे उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमा पूजन व हारार्पणाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाच्या व दिनविशेष यावर प्रकाश टाकला. प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले प्रा. डॉ. संतोष मिसाळ यांनी महात्मा गांधी यांची स्वच्छतेच्या मुल मंत्र पटवून देऊन स्वच्छ भारत या संकल्पनेवर प्रकाश टाकला. आपल्या अध्यक्षीय विचार मांडतांना प्राचार्य

डॉ. निता तिवारी यांनी महापुरुष, महात्मे यांचे विचार हे बोधप्रद असतात. हे विचार आत्मसात करून कृतिशील बना हा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी खडकी परिसरात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकाच्यावतीने परिसर स्वच्छतेचे कार्य करण्यात आले तसेच रॅली व पथनाट्याद्वारे स्वच्छतेबद्दल परिसरात जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना च्या स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे संचालन कु. हेमा गोहर व आभार प्रदर्शन मंगेश बागडे यांनी केले.



महात्मा गाँधी जयंती

• दि. १५ ऑक्टोबर २०२२ रोजी वाचन प्रेरणा दिवस आयोजन

श्री धाबेकर कला महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ. नीता तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली १५ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.

दिवस साजरा करण्यात आला.

## • दि. ३१ ऑक्टोंबर २०२२ रोजी राष्ट्रीय एकता दिवस आयोजन

प्रभारी प्राचार्य डॉ. नीता तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांच्या उपस्थितीत सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती तसेच माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी निमित्त दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी त्यांना अभिवादन करण्यात आले.

• दि. ३ जानेवारी २०२३ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती आयोजन

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने महाविद्यालयात दि. ३ जानेवारी २०२३ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीता तिवारी तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. स्वाती फाले या उपस्थित होत्या. याप्रसंगी प्रा. डॉ. अमरिश गावंडे यांची ही उपस्थिती होती. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.स्त्री जीवनाची उद्धारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश आपल्या प्रास्ताविकातून प्रा. डॉ. अमरिश गावंडे यांनी टाकला. प्रमुख वक्ता म्हणून लाभलेला प्रा. स्वाती फाले यांनी आपल्या मनोगतातून सावित्रीबाई मुळेच स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली.या संधीचे सोने करून जीवन बदलवा हा मूलमंत्र उपस्थितांना दिला. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नीता तिवारी यांनी देशाच्या सर्वांगीण विकासात स्त्री वर्गाचे मोठे योगदान आहे. हे योगदान स्त्रीया ह्या सावित्रीबाईच्यामुळेच देऊ शकल्या असे मत मांडले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व शिक्षक व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन राहुल गवई व आभार प्रदर्शन कु. विद्या ढोरे यांनी केले.

• दि. १२ जानेवारी २०२३ रोजी युवा दिन कार्यक्रम संपन्न

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती पर्वावर दि. १२ जानेवारी २०२३ रोजी युवा दिनाच्या कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीता तिवारी ह्या प्रमुख उपस्थिती म्हणून हे लाभले होते. या प्रसंगी डॉ. संगीता लोहकपुरे यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रंमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून हार अर्पण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राहुल घुगे यांनी करतांना राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेऊन या दिनाला युवादिन का संबोधतात हे पटवून दिले. प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले प्रा प्रियदर्शन मेंढे यांनी आपले विचार व्यक्त करतांना सशक्त भारतासाठी युवावर्गाच्या सक्रिय देशकार्याची गरज आहे, हे सोदाहरण पटवुन दिले. आपल्या अध्यक्षीय विचारातुन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निता तिवारी यांनी जयंत्या ह्या फक्त प्रसंगिक म्हणून साजऱ्या करू नयेत तर या प्रसंगी जे महापुरुषाबद्दल विचार ऐकयला मिळतात ते आत्मसात करून जीवन प्रवास केल्याने ध्येय प्राप्ती होऊ शकते असे मत मांडून महापुरुषांच्या विचारांचे महत्त्व उपस्थित विद्यार्थ्यांना पटवून दिले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनाच्या कु. आरती सदांशिव, गोपाळ चंदनगोळे, कु. पुनम इंगळे या विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता प्रा. रेखा अढाव, डॉ. संतोष मिसाळ, डॉ. अमरीश गावंडे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. याप्रसंगी समाजात जाऊन जनजागृती करण्याच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी संकल्प केला. या कार्यक्रमाचे संचालन धम्मपाल उपरवट व आभार प्रदर्शन कु. पूजा कोडापे यांनी केले.



युवा दिनानिमित्त पूजन करतांना   मान्यवर

८ मार्च महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम

आरोग्य मार्गदर्शन कार्यक्रम




मतदार मार्गदर्शन कार्यक्रम



मतदार जनजागृती कार्यक्रम




मतदार मार्गदर्शन कार्यक्रम



मतदार जनजागृती कार्यक्रम




मतदार मार्गदर्शन कार्यक्रम




शपथ ग्रहण कार्यक्रम

## • दि. २३फेब्रुवारी २०२३ रोजी संत गाडगेबाबा जयंती साजरी

श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने २३ फेब्रुवारी २०२३रोजी संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. यावेळी व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रभारी प्राचार्य डॉ. निता तिवारी व पुरुष कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित आणि प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुश्री सरिता मेहकरी आणि सुश्री आनिता ताराम (नागरी आरोग्य केंद्र सिंधी कॅम्प, खडकी) म.न.पा. अकोला हे लाभलेल्या होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य संदर्भात मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. नीता तिवारी यांनी दिला. या कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी केला आणि आभार राहुल गवली यांनी मांडला. यावेळी मोठ्या संख्येने सर्व विद्यार्थी उपस्थित होते.




संत गाडगेबाबा जयंती निमित्त आयोजित




महाविद्यालय परिसर स्वच्छता



• दि. ८ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिन कार्यक्रम संपन्न

महाविद्यालयात दिनांक ८ मार्च २०२३ रोजी प्रा. डॉ. नीता तिवारी यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रा रेखा अढाव उपस्थित होत्या. यांनी आपले विचार व्यक्त करताना समाजात मह्रिलांची स्थिती उद्यमशीलता वाढवण्याची गरज पटवुन दिली.




८ मार्च महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम

# अभिप्राय

आज दिनांक ०८/०८/2022 रोजी श्री. धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले. या लसीकरण शिबीराला मी निलेश पवार ~~म्हणून~~ आरोग्य सेवक PHC कापसी उपस्थित होतो. हे शिबीर यशस्वी करण्या करिता प्राचार्य, महाविद्यालय प्रशासन व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. एकंदर हे शिबीर शांततेने पार पडले.

दिनांक – ८/८/2022

निलेश पवार

अभिप्राय

मी सौ. सुजाता जवंजाळ आरोग्य सेवीका पि.एच.सी कापशी येथे कार्यरत आहे आज मी धाबेकर कॉलेज मध्ये लसीकरण शिबिराला उपस्थीत होती ह्या शिबीराला उत्स्फुर्त प्रतीसाद मिळाला सर्वांचे सहकार्य लाभले

Smjunjal
ANM
सौ. सुजाता जवंजाळ

जनमाध्यम

| शुक्रवार, ४ नोव्हेंबर २०२२ |

epaper : janmadhyam.com | mail : jmakola.thakur@gmail.com

# धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय एकता दिवस साजरा

**प्रतिनिधी । खडकी**

स्थानिक श्री धाबेकर कला महाविद्यालय येथे ३१ ऑक्टोबर रोजी भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त व प्रथम महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाविद्यालयात कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीता तिवारी ह्या होत्या याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संतोष मिसाळ हे तर याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेश पंडित हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल व श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.



प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले डॉ. संतोष मिसाळ सर यांनी पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या भारताच्या जडणघडणीतील कार्याची तसेच प्रथम गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याची माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय विचारातून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीता तिवारी यांनी लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल व श्रीमती इंदिरा गांधी यांच्या विचारांची आज देशाला गरज असल्याचे प्रतिपादन केले. राष्ट्रीय एकता दिवस यावर प्रकाश टाकला.

याप्रसंगी देशातील एकता वाढावी म्हणून शपथ सुद्धा घेण्यात आली. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांचे आभार म्हणून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

जनमाध्यम

मंगळवार, ३० ऑगस्ट २०२२

# श्री धाबेकर कला महाविद्यालयात वृक्षारोपण



**प्रतिनिधी । खडकी**


स्थानिक श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २० ऑगस्ट रोजी भव्य वृक्षारोपगाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नीता तिवारी यांचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. हा कार्यक्रम जरी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित करण्यात आला असला तरी काळाची गरज म्हणून या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयीन सर्व शिक्षकांनी यात आपले हिरीरीने योगदान दिले. हे वृक्षारोपण महाविद्यालयाच्या प्रशस्त प्रांगणात करण्याचे ठरविले होते त्यानिमित्त तिथे उपस्थित झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवकांना संबोधित करीत असताना प्राचार्य डॉ. नीता तिवारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे पुरुष कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेश पंडित यांनी 'झाडे लावा झाडे जगवा जीवन जगवा' वृक्ष संवर्धन काळाची गरज जागतिक पातळीवर तापमान का वाढत आहे वृक्षारोपणाबरोबरच वृक्ष संवर्धन कसे महत्त्वाचे आहे हे पटवून दिले. याप्रसंगी कडू निंब, बदाम , निंब, पिंपळ, वड साग. यांची एकूण ४५ झाडे लावण्यात आली. वृक्षारोपनानंतर लावलेल्या झाडाचे वाटप झाडांची योग्य निगा राखण्यासाठी उपस्थित विदयार्थ्यांना करण्यात आले. किमान १ वर्ष वृक्ष संवर्धनाची काळजी घ्या अशी अपेक्षा त्यांच्याकडून घेण्यात आली. यावेळी वृक्षारोपनाबरोबरच वृक्ष संवर्धन आंम्ही करू अशा प्रकारचा संकल्प उपस्थित आमच्या वतीने यावेळी करण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले सर्वांच्या आभार मानून या कार्यक्रमाचा शेवट करण्यात आला.

जनमाध्यम ■ अमरावती, शनिवार, १३ ऑगस्ट २०२२

# श्री धाबेकर महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा

■ प्रतिनिधी । खडकी ■

स्थानिक श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने स्वांतंत्र्याचा अमृत महोत्सव या पर्वावर दिनांक ९ ऑगस्ट रोजी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नीता तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेश पंडित यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर मनोगत प्रा. डॉ. सुरेश पंडित यांनी करताना क्रांती दिनाचे महत्त्व विशद करून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त आयोजित केलेल्या 'हर घर तिरंगा' या उपक्रमाची माहिती दिली. तसेच या पर्वावर आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धेच्या संदर्भातील नियमावली समजावून सांगितली या स्पर्धेत एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत रा.से. यो. स्वयंसेवक व स्वयंसेविका सहभागी झाल्या होत्या. यामध्ये अमित पहुरकर, राहुल गवई, निकिता मातळे, सायली मातळे, गायत्री तायडे, पोर्णिमा जाधव आदींचा समावेश होता. सर्व रांगोळ्या देशभक्तीपर होत्या. यात कु. निकिता मातळे, गायत्री तायडे व पौर्णिमा जाधव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला. स्पर्धेच्या शेवटी पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना गौरवांकित करण्यात आले. स्पर्धेची सांगता सर्वांचे आभार मानून व राष्ट्रगीताने करण्यात आली. या स्पर्धेच्या यशस्वी ती करिता महाविद्यालयातील सर्व शिक्षक व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यीनी सहकार्य केले.

# जनमाध्यम


एक प्रतिष्ठित सवय

अकोला | वाशिम | बुलडाणा

| मंगळवार, २७ सप्टेंबर २०२२ | मूल्य ३.०० | पृष्ठे ८ |


## श्री धाबेकर कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा

प्रतिनिधी । अकोला



स्थानीक श्री धाबेकर कला महाविद्यालयात २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. संतोष मिसाळ हे होते या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ

अशोक वाहुरवाघ हे लाभले होते त्याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी व पुरुष कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.सुरेश पंडित हे सुद्धा उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने तसेच राष्ट्रीय सेवा योजना गीताने करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुरुष कार्यक्रम अधिकारी डॉ. सुरेश पंडित यांनी करताना राष्ट्रीय सेवा योजना काय आहे, आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या दिनविशेषाचा इतिहास समजावून सांगितला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले प्रा.डॉ. संतोष मिसाळ यांनी सुद्धा आपल्या अध्यक्षीय विचारातून समाधान समाजोन्नती, व राष्ट्रउन्नतीत आज राष्ट्रीय सेवा योजनेचा महत्वाचा वाटा असल्याचे मत सोदाहरण पटवून दिलं या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. गायत्री तायडे व आभार प्रदर्शन कु. पौर्णिमा जाधव यांनी केले त कार्यक्रमाचे यशस्वीतेकरिता महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाची उपस्थिती लक्षणीय होती. याप्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे जे ज ध्येय आणि उद्दिष्ट आहेत त्याची आम्ही प्रामाणिकपणे अंमलबजावणी करणार अशा प्रकारचा संकल्प सुद्धा याप्रसंगी केला. सर्वांचे आभार मानून त्या कार्यक्रमाची समाप्ती करण्यात आली.